

REFBK-0002827

REFBK-0002827

दु. आ. तिवारी.

२८२७
ॐ

# राधा-माधव.



धेनु लावुन पुढें चरण्याला। सेवितो प्रभु शिलाधरणीला ॥

[ सर्ग १-६४ ]

ॐ

# राधा–माधव

## सचित्र–खंडकाव्य

REFBK-0002827

REFBK-0002827

ॐ

# राधा-माधव

## सचित्र-खंडकाव्य

लेखक

दु० आ० तिवारी, जळगांव

( हक्क ग्रंथकर्त्याकडे )

फेब्रुवारी १९२५

किंमत दहा आणे


पुणें येथें
आर्यभूषण छापखान्यांत अनंत विनायक पटवर्धन
यांनीं छापिलें व दु० आ० तिवारी यांनीं
जळगांव, जि. खानदेश येथें प्रसिद्ध केलें.



रावसाहेब - रूपचंद मोतीराम,

जळगांव.

# अर्पण-पत्रिका.



राधा- माधव.

## हें वाङ्मयपुष्प
## रावसाहेब रूपचंद मोतीराम
यांस
## सादर अर्पण केलें आहे.

या पुस्तकाच्या प्रकाशनाचें सर्व श्रेय त्यांजकडे आहे. रावसाहेबांचें औदार्य महाराष्ट्र वाङ्मयोत्तेजनाच्या मार्गानेंही असेंच प्रगट होऊन तें त्यांस वाङ्मयोद्यानांत कीर्तिप्रद होवो अशी राधामाधवाच्या चरणीं प्रार्थना आहे.

विनीत
दु० आ० तिवारी.

# आत्मनिवेदन.

माझे कविमित्र श्रीयुत आप्पासाहेब ( केशव महादेव ) सोनळकर व मी काव्य विषयावर बोलत असतां ते म्हणाले, कित्येक संस्कृत व मराठी कवींनीं राधाकृष्णाचा विकृत संबंध कल्पूनच त्यावर कविता लिहिल्या यास कारण कदाचित् तत्कालीन शृंगाराप्रियता असेल; तथापि जो त्रैलोक्याचा स्वामी, जो जगत्पिता त्याच्या ठायीं व्यभिचार संभवत नाहीं. तेव्हां राधामाधवाचा भक्तिसंबंधच यथार्थ होय. हा संबंध दृष्टीसमोर ठेवून राधामाधवाविषयीं लिहिलेलें एखादें खंडकाव्य मराठींत वाचकांपुढें नाहीं. तरी तुम्ही या विषयास अवश्य चालना द्या. माझ्या प्रियमित्राची ही सूचना मला अत्यंत हृद्य वाटली. व मी या राधामाधवाच्या भक्तिरसांत आनंदानें उडी टाकली.

हें काव्य लिहून झाल्यानंतर काव्यरत्नावलीचे संपादक श्रीयुत नारायण नरसिंह फडणीस यांनीं त्याचे ७ ही सर्ग १९२३।२४ सालीं रत्नावलींत प्रसिद्ध केले. त्यानंतर आमचे रसिक कविमित्र माधवीय, यांनीं या खंडकाव्यावर उद्बोधक टीका लिहिली. हें काव्य सचित्र प्रसिद्ध करावें असा माझा व माझ्या सन्मित्राचा पहिल्यापासून हेतु होता. पण द्रव्याभावीं केवळ काव्याचें देखील

स्वतंत्र प्रकाशन करितां येईना. अशा स्थितींत जळगांव येथील उदार व वाङ्मयोत्तेजक गृहस्थ रावसाहेब रूपचंद मोतीराम यांस मीं माझा हेतु कळविला व त्यांनीं तत्काळ माझ्या विनंतीस मान देऊन 'राधामाधवाच्या' सचित्र छपाईचा संपूर्ण खर्च दिला ! म्हणून मी त्यांचा अत्यंत आभारी आहें.

हल्लीं जळगांव येथें असलेल्या नाटचकलाप्रवर्तक मंडळीचे मालक श्रीयुत "भाटे" यांनीं पूर्व परिचय लक्षांत घेऊन आपल्या कंपनींतील नटांचे फोटो घेऊं दिले यामुळें त्यांजविषयीं मला प्रेमादर वाटत आहे.

आर्यभूषण छापखान्याच्या चालकांनीं अगदीं सरळपणें अल्पकाळांत या बुकाची सुंदर छपाई केली, यावरून आरंभीं माझ्या स्नेह्यानें या प्रेसाची केलेली प्रशंसा माझ्या प्रत्ययाला आली.

दु० आ० तिवारी
जळगांव पू० खा०

# “राधा – माधव”

## सर्ग १ ला

या सर्गांत प्रारंभीं गोकुळांतील कृष्णावताराचें वर्णन आहे. पुढें भगवान् श्रीकृष्ण आपल्या गोपमित्रांसह यमुनेवर गाई चारण्यास जात आहेत, पाणवठ्यावरून येणाऱ्या गोपी त्यांस पहात आहेत, मागून येत असलेली रूपसुंदरी राधा कृष्णास पाहून तन्मय होते; श्रीकृष्ण तिला यमुनेवर येण्याला खुणवितात. इकडे इतर गोपी राधेच्या सासूस ती कृष्णाकडे पाहत वाटेंत उभी आहे, असें कळवितात. श्रीकृष्ण यमुनेच्या कांठानें जात असतां तेथील निसर्गशोभा, जनसंमर्द, पशु-पक्ष्यांच्या लीला यांचें शेवटीं वर्णन आहे.

( स्वागता )

१

कृष्णावतारः—

जो अधीश्वर समस्त जगाचा
खोल सागर यदीय यशाचा
ज्यास बोलति जगत्प्रतिपाळ
होय नंद–सदनीं प्रभु बाळ

मराठी ग्रंथ संग्रहालय
२८२८
दा. क्र.

२

अंत लागत नसे मुळिं ज्याचा
'नेति नेति' वदते श्रुति वाचा
घे स्वरूप जगतीं सगुणाचें
भाग्य थोर किति हो! मथुरेचें

३

सेविती सकल सिद्ध पदाशीं
जाहल्या विनत सिद्धिहि दासी
कल्पवृक्ष निजभक्त जनांचा
होय मित्र हरि तो गवळ्यांचा

४

धन्य भाग्य मथुरा नगरीचें
धन्य भाग्य यमुना सरितेचें
धन्य भाग्य व्रजवासि जनांचें
ज्यांस दर्शन सदैव हरीचें

५

येइ थोर भरती जलधीला
उंच मस्तक करी हिममाला
इच्छिती उभयतां बघण्याला
काव बाळ जगदीश्वर झाला

६

पार्वतीश्वर हिमालयवासी
येउनी वसतिला वरि काशी
तो उमापति रमापति–लीला
पाहतां स्थिर तिथेंच जहाला

७

बाल–रश्मि रवि पूर्व दिशेला
घेउनी कनक–सुंदर शेला
जागृत द्विजसमूह करून
'कृष्ण कृष्ण' वदवी मधु–गान

८

ते प्रपात यमुना–सलिलाचे
कृष्णगीत वदती निजवाचे
भृंग तेंच कथिती नलिनीला
ती प्रफुल्ल करिते स्मितलीला

९

ऐकतां भजन वायु मुखानें
डोलती तरुलता कुतुकानें
वात–पूर्ण नव कीचक–दंड
बोलतात हरि–नाम अखंड

१०

भाव संकुल चराचर सृष्टी
बोलते हरि–यशोगुण–गोष्टी
जागवी सकल जो धरणीला
गोप त्यास बघती निजलेला

कृष्णप्रबोधनः—

११

क्षिरसागर तटीं निजणारा
शेषदेह शयनीं वरणारा
हालवी सकल सूत्र जगाचें
ऐकतो वचन मातृमुखाचें

१२

" ऊठ ? ऊठ ? ब्रिजलाल ! कन्हय्या !
गोप–मित्र वळले वनिं जाया
गोंपुरीं परतल्या तुजसाठीं
धेनुका सकल या जगजेठी. "

१३

लावुनी कर हळूच यशोदा
जागवी जननि बालमुकुंदा
" हा पहा ! रवि किती वर आला
ऊठ ? ऊठ ? उघडी नयनाला "

१४

मातृ—हस्त शिवला सुखकारी
बैसला उठुन कुंजविहारी
पाहिला प्रिय सुहृज्जन—संघ
बालनाथ हसला चतुरंग

१५

सुप्रसिद्ध जगिं यद्बलयष्टी
तो समर्थ वरि कंबल—यष्टी
जो निशाचर—रणीं बलहारी
तो निघे रुचिर कंबलधारी

१६

जो विशाल भुवनत्रय तारी
मागतो जननिलागिं शिदोरी
चालला उपवनीं वनमाली
गोपिकावलि जलास निघाली

१७

गोपिकांस कृष्णदर्शनः—

घेउनी घट शिरीं यमुनेचे
ते समूह वळले तरुणींचे
चालतां हळु हळू अभिरामा
तोषती बघुन गोप-ललामा

१८

एक मान वळवून पहाते
हालतें जल वरून वहातें
बिंदु बिंदु गळतें मुखिं वारी
ती नितंबिनि तयास निवारी

१९

एक हस्त वरतीं कलशाला
तो दुजा कर कटिस्थ घटाला
हालतां पदर पीन कुचाचा
झांकते त्यजुन हस्त शिरींचा

२०

फूल एक बुचड्यांत गुलाबी
नेसली वसन लाल गुलाबी
अप्सरा उतरली धरणीला
कल्पना उचित ही रमणीला

२१

कामिनी अरुण बिंबफलोष्ठी
शुभ्र–कुंदकलिका–रदपंक्ति
चित्तरंजक कलापवती ती
कीं रतीपरि जिची तनुकांती

२२

मानिनी कमलनील–कटाक्षी
चालतां हरिमुखास निरीक्षी
तों चुकून घसरे पद तीचा
मान–कुंभ फुटला युवतीचा

२३

हालवीत निज–सिंहकटीला
चाळवीत नयन–भ्रुकुटीला
आंत एक; वदते वर कांहीं
मैत्रिणीस म्हणते 'चल बाई !'

२४

गोपिका गगननील–कुमारा—
—भोंवतीं विकसल्या जणुं तारा
निर्विकल्प विभु शून्य विकारी,
लाजती निजमनीं सुकुमारी

२५

गौळिणी कुमुदिनी; हरि चंद्र !
कल्पना युवति; श्याम कवींद्र !
सिद्ध तो; गवळिणी जणुं सिद्धी !
त्या तरंगिणि जणों; हरि अब्धि !

२६

कीं पयोद विभु; गोपि मयूरी !
तो दिनेश्वर; सरोजिनि नारी !
पुण्यराशि हरि; भूतदया या !
तो तपोनिधि; तपस्विनि माया !

२७

पाहती करुन नेत्र विकासा
तृप्त होय नच नेत्रपिपासा
भक्तिबद्ध सुमती सकलांची
व्यर्थ भीति जनदोषवचांची

२८

तो मनोरथ; सती अभिलाषा
तो महोदयाहि; या सकलाशा
मस्तकीं असुनिही घटभार
गोपिका विसरल्या घरदार

२९

पुंडरीकवदना हरिणाक्षी
प्रार्थितात विभुला निजवक्षीं
नंदराज– सुत सुंदरलाल
हा असो हरि सदैव खुशाल

३०

नंद–नंदन महोदय कान्हा
हाच गोकुल–महज्जन–राणा
सद्यशोनिधि गमे सकलांचा
हा करील वध कंस रिपूचा

३१

पांग फेडिलहि दीन जनांचे
दाखवील दिन हाच सुखाचे
हा जिवापरिस नित्य जपावा
वाजवीत फिरतो वनिं पावा

३२

राधिकेस कृष्णदर्शनः—

राधिका विकचपद्मविलासी
लीन जी सतत कृष्णपदाशीं
श्रोणिकांचिगुणशब्दवती ती
येइ मागुन महोत्सुक–रीती

३३

भासवी कुसुम–कानन हास्यें
यक्षिणीच दुसरी जणु भासे
मोहवी रसिकलोक–कदंबा
भूवरि उतरली जणुं रंभा

३४

शुभ्र शुभ्र कदलींतिल गाभा
त्यावरून रचिली तनुशोभा
चांदनीय रस घेउन धाता
काय गौर वपु निर्मित होता ?

३५

क्षाळिली कृति पयोनिधिमाजीं
ब्रह्मदेव मग टाकि समाजीं
तीच ही युवति सुंदर राधा
शोभते, असुन वेषहि साधा

३६

दृष्टिला विमल दृष्टि मिळाली
हांसली सति; हंसे वनमाली
भक्त–दास हरि; ती हरि–दासी
हा विचार कुठला जनतेशीं ?

३७

राधिका अचल तन्मय होती
कृष्णमूर्ति मधु हास्य करी ती
बोलण्यास जरि उत्सुक होई
दिव्य भाव मुखिं बोलत नाहीं



श्रीहरी खुणवुनी पद टाकी ।
ये म्हणे सलिलपुण्यतटाकीं ॥

सर्ग १-४०

३८

" भक्तिची चटक लावुन राया
लाविला असह जाच सहाया
मी तुझ्यास्तव फिरे अनिवार
आवडे तुजसि कुंजविहार. "

.३९

मूक शब्द मनिं बोलत होती
लोचनांत जलबिंदु वहाती
होय सद्गदित विश्वनियंता
अंत नाच बघवे बलवंता

४०

श्रीहरी खुणवुनी; पद टाकी
" ये म्हणे सलिलपुण्यतटाकीं
तेथ एकरस होउन जाऊं
दिव्यभाव—सुख आपण सेवूं "

४१

राधिका वळुन जों मग पाहे
एकही न सखि सान्निध आहे !
श्वश्रु आणि पतिचें भय चित्तीं
पुष्कराजवदना चमके ती

४२

यमुनातटवर्णनः—

कालिया भुजगशीर्ष—विहारी
चालला हळु हळू गिरिधारी
होय ती जरि अगोचर मूर्ती
राधिका तरि पहातचि होती

४३

मंद मंद अनुकूल समीर
शांतवी मृदुल शाम शरीर
त्रास होइल हरी—चरणाला
विस्तरीहि यमुना सिकतेला!

४४

चंड भानु—कर—ताप हराया
तच्छिरावरि करी तरु छाया
अर्पिती तरुलता सुमनांला
प्रांत गंधमय सर्व जहाला

४५

टाकुनी निजमुखांतिल चारा
थाटतात शिखि रम्य पिसारा
उंच मान अपुली उभवोनी
गीत गाति निज—कंठ भरोनी

४६

ताम्र होय मुख, कंठ फुटेही
कृष्णगान शुक सोडित नाहीं
भक्ति जाणुन तई भगवंत
" नीलकंठ " पद दे जगतांत

४७

नीलरत्न किरणासम जेथें
हालती नवतृणांकुर वातें
तें कुतूहल किती सुखकारी
तेथ धेनु जगदीश्वर चारी

४८

जों न तत्पद शिवे सलिलाला
तों प्रमोह पडला यमुनेला
वीचि–हस्त शिवला चरणाला
फेनहर्ष वदनीं सरितेला

४९

एकमेक धरुनी कर–शाखा
डोलती विटपपंक्ति कितीका
रोमहर्षित जणों शरिरानें
हांसती विटप पुष्पमिषानें

५०

यूथिका नयन तोषविणारी
केतकी हृदय मोहविणारी
नासिका–सुखद आत्मसुगंध
सोडिती बघुन नंद–सुनंद

५१

पुण्यपावन अशा वनगाई
येति पावन–जलीं लवलाही
पातल्या हिमगिरीश्वर–बाला
भेटण्यास अपुल्या भगिनीला

५२

जेंवि शुभ्र गळती जलधारा
वायुकंपित तदीय पिसारा
गौरवर्ण विलसे शरिराचा
लेप काय दिधला अमृताचा

५३

नाभिगंध मृग धांवत येती
तों दिशा परिमलान्वित होती
प्राशुनी जल, समूह तयांचा
भूषवी तट पवित्र जलाचा

५४

हे कुरंग तिकडे वनगाई
हीं मुलेंच यमुने ! तव बाई !
सेवितात तव तीरपदाला
शोभशी विमल मातृपदाला

५५

भृंगराजि मधुपान–विलोभें
पुष्पयुक्त बकुलावरि शोभे
खालतीं पसरली सुममाला
चित्रवर्ण वसुधेप्रति आला

५६

मत्स्य नील–सलिलांतरवासी
बद्धपंक्ति रमती लहरींशीं
येति खालिं, वर, चंचल भागीं
अंगकांति चमके धवलांगी

५७

जेथ दुःख विसरून वसावें
जेथ भान विसरून रमावें
जेथ सात्विक–विचार सुचावे
सेविती मुनि तटाप्रति भावें

५८

द्वेष मोह सगळे पळती ते
मान दंभ वळती शरणातें
राग लोभ शिवती न मनातें
मत्सरादि करिती नमनातें

५९

चक्रवर्ति नृपती जरि आला
येइल स्थिति निगर्व तयाला
पातलाहि अमरेश्वर येथ
लीनता वरिल जोडुन हात

६०

सृष्टिची अखिल मंगलता हो !
स्वर्गलोक—नवसुंदरता हो !
मूर्तिमंत वसते नित येथें
देहमुक्ति घडते सकलांतें

६१

येउं द्या अधम हिंसक कोणी
पापकर्मरत अंत्यज—वर्णी
मेळवील निज—मानसशुद्धि
संस्तरील अनिवार भवाब्धि

६२

स्नानशुद्ध ऋषि साधु महात्मे
भस्म चर्चुन समस्त तनूतें
ध्यानमग्न दिसती बसलेले
कांहिं पोहति जटा सुटलेले

६३

देवकी–तनय गोकुल नाथ
तीर्थवासि जनता सुखवीत
एक एक पद टाकित जातो
मागुती वळुन शाम पहातो

६४

धेनु लावुन पुढें चरण्याला
सेवितो प्रभु शिला–धरणीला
गोप सर्व जमतात सभोंतीं
शाम रत्नकिरणेंच जणों तीं

# राधा-माधव

## सर्ग २ रा

राधेची सासू तिला दुःशब्दांनीं छळते. बाहेरून आलेला तिचा पति तिला विचारून पुरें पुरेंसें करितो. ती निरनिराळ्या प्रतिज्ञांनीं श्रीकृष्णाविषयीं आपला भक्तिभाव प्रकट करिते आणि शेवटीं त्याला सांगते कीं, 'मी पुढें जातें तुम्हीं मागून या; आणि देव व भक्त यांचा शुद्ध संयोग बघा.'

( वसंततिलकावृत्त )

१

राधेला सासुरवासः—

आली गृहास नव–पीनपयोधरा ती
श्वश्रू उभी परुषवाक्पटु तेथ होती
सक्रोध पाहुन तिनें मग त्या स्नुषेला
आरंभिलें परुषवाक्शर–ताडणांला

२

" अद्याप होतिस कुठें वद राधिके! तूं
आहे मनांत तुझिया वद काय हेतु!
लोकांत काय तुझिया विषयीं प्रवाद
डोळ्यावरील अजुनी उतरे न माद

३

दुःश्राव्य दोष दिधले तुजला जनांहीं,
चांडाळिणी ! तरि कशी तुज लाज नाहीं;
कृष्णासवें हंसत होतिस ना पथांत ?
नाहींच धाक शिवला तुजला मनांत.

४

कैशी कुलांत कुलटी उलटी निघाली
दुर्दैव काय ! अमुच्या जडली कपाळीं
गेहीं मुली किति सांगुन येत होत्या
ही पापिणी वरियली त्यजुनी अहो ! त्या

५

देहीं सुरूप तरि काय करावयाची,
पोटीं सुरी खुपसवे नच कांचनाची,
जी थोरवीस चढवी अपुल्या कुलाला,
ती सून मान्य न कशी सगळ्या जनांला ?

६

गोपालकृष्ण–मुरली श्रवुनी अधीरा
ही आंत बाहिर करी किति येरझारा
' पाणी घरांत सरलें, तर जाउं कां मी ? '
हा प्रश्न मात्र पुसते मज नित्य धामीं !

७

कीं पाककर्म, निसणें, टिपणें न कांहीं
पाण्याविना मुळिंच काम घरांत नाहीं
संसाररीति असली कसली बयेची
ही सून हानि करिते अमुच्या यशाची

८

आला कुठून शिकुनी मुरली सुरंगी,
हीलाच कां भुलवितो तरि अंतरंगीं;
तो चेटकी; नच तया मुळिं ताळतंत्र,
कानांत काय भरला हिचिया कुमंत्र!

९

थोडें कुठें क्षणभरी निजलें दुपारीं,
तों ये करून तितुक्यांतचि एक फेरी!
सांगा कितीक जपणार तरी मुलीला,
मेली न कां अजुन ही, जगली कशाला!

१०

शेजारिणीकडुन सत्वर आण शाल,
येते कशास तिकडे बसली खुशाल!
हे ढंग कोठवर मी असले सहावे
दावा उभा हिजसवें मम याच भावें

११

मी भेट घेउनि घरीं विनवीं यशोदा
" बाई जरा शिकवि गे ! तुझिया मुकुंदा "
हो ! हो ! म्हणून मज लावियलें घराला
तों मागचाच पुढतीं परिपाठ आला !

१२

जात्यावरी बसविलें हिजला घरांत
घोळूनि घोळुनि वदे हरिनामगीत
वृंदावनास करिते किति रोज फेऱ्या;
श्रीकृष्ण ! कृष्ण ! वदते वदनीं लकेऱ्या

१३

मी अन्न खाइं, परि तें मज अन्न खातें;
माझें किती पाळिपळी तरि रक्त आटे !
हीचे पहा पण कसे वर गाल येती
एकास बाइ चिरिले तर दोन होती !

१४

केलें कसें वदन, खापर हें पहा ना !
कीं मारिल्या जणुं कुणी वरती वहाणा
गंगा तशीच यमुना स्रवतात नेत्रीं,
कोणी म्हणेल जणुं विंधियलेंच शस्त्रीं.

१५

दुर्मार्गवर्तिनि परी बनली कुभांडी,
सोडी न मार्ग, अधिकाधिक खेळ मांडी;
आतांच येइल तुझा पति गे ! घराला,
हे ढंग आज कथितें सगळे तयाला.

१६

आतां नको मज मुळीं असली राहाणी,
राहूं न देइन तुला आजि या ठिकाणीं
जा ! जा ! कशी, पद न या सदनांत टाकी,
तो वाट पाहत असे यमुनातटाकीं "

१७

अत्यंत तीव्र विष जें भरलें मुखांत,
नागीण टाकित असे तिचिया तनूंत;
अत्यंत विद्धहृदया सति राधिका ती
अश्रूभरें पदर चिंब करीत होती.

१८

शस्त्रप्रहार करुनी तनुला छळावें,
तीच्यांत मीठ वरतीं स्वकरें भरावें,
तें घोर दुःख दुसऱ्यांस कसें कळावें,
ज्याचें तयासचि, नसे इतरांस ठावें.

१९

वैकुंठनायक, पयोनिधिसन्निवासी,
ब्रह्मांडचालक, समस्त जगद्विलासी;
दे जन्म नाभिकमलांतुन जो विधीला,
जावें तया शरण, युक्त गमे तियेला

२०

राधेची मनोमय प्रार्थनाः—

" तूं भक्तवत्सल दयाघन सत्यवेत्ता
भक्तीण मी असुन कां पसरे कुवार्ता ?
राया ! असत्य रुचतें तुजला कसें तें ?
लोकीं तुझेंच यश दूषित मात्र होतें !

२१

त्वत्पादसेवन वृथा गमतें मनाला,
कां गांजितात खल भक्तिपरायणाला;
कृष्णा ! तुला मग बरें भजतील कोण ?
मी विव्हला तरि तुझ्या चरणीं विलीन !"

२२

भक्तवत्सलाविषयीं कल्पनाः—

राधाविलापरव ऐकुनि अंतरंगीं;
झाला असेल हरि कंपित तो निजांगीं;
साध्वी स्त्रियांस पदपूजनयोग्य राधा
तो सर्वसाक्षि तिज देइल काय बाधा ?

२३

दावावया भुजपराक्रम एक वेळ
फेंकून कंबल कटी कसली असेल
केला असेल किरिट स्थिर बंधनानें
भक्तार्थ तुच्छ गणिलें सुख तें जयानें

२४

काढूं सुदर्शन, करूं जन काय नष्ट ?
राधेस देति जन कां अनिवार कष्ट ?
ऐसें म्हणून विभू तो उठला असेल
किंवा न वेळ म्हणुनी उठला नसेल

२५

शेजारिणी सकल होऊन शाहण्या त्या
तीतें शहाणपण त्या शिकवीत होत्या
दाहा मुखें बरळती मग एकटीनें
तो कोरडा करुन कंठ न कांहिं होणें

२६

"ही भेटली तुजसि सून कुपात्र बाई !
भाळीं तुझ्या न लिहिलें सुखलेश कांहीं
ही थोर उंच परि उंटिण वाढली ना ?
कांहीं करा कुटिल वक्रपणा त्यजीना !"

२७

राधेची योग्यताः—

गंगेसमान विमला सुरसेव्यमाना,
कीं जान्हवीच परमोचित सज्जनांना
जी राधिका रुचिर शुभ्र सती यशाची
ती आज निंद्य गमली सकलांस कैची ?

२८

सत्कंठ भूषण जिला प्रिय ‘कृष्ण’ नाम,
कीं कर्णभूषण जिला प्रिय एक शाम
सच्छीर्षभूषण हरीचरणीं प्रणाम
शामाविना तिज नको मणिरत्न हेम

२९

स्वर्गातल्या त्रिदशसुंदर योषितांनीं
मंदारहार करुनी अपुल्या करांनीं
कंठांत घालुन जिला अति गौरवावें
हा ! हा ! वृथाच तिज कां कुजनीं छळावें

३०

अत्यंत कष्ट करुनी सगळ्या ऋषींनीं,
जें थोर पुण्ययश मेळविलें तपांनीं;
राधेय भक्तिपुढतीं यश तें तदीय,
आहे उणें वच असत्य न हें मदीय.

३१

ह्या तारका चमकती गगनीं कशाला
कां जान्हवीस उठती लहरी विशाला ?
संध्या उषा मधुर हांसति कां कपोलीं ?
राधा तयास गमते जगीं धन्य झाली.

३२

सीता सदोष जरि दुर्जन बोलतील
गौरीस शब्द भलता जरि लावतील;
साहेल कोण असलें वच निंद्य त्यांचें,
राधास्वरूप नयनीं शुचिदर्शनाचें !

३३

छे ! छे ! असा पण कुठून विचार यावा,
राधेस लोक वदती कुलटा अहाहा !
ऐशा गतानुगतिला वरितात लोक,
घंटाध्वनी पसरुनी फुकतात शंख

३४

राधारमण घरीं येतोः—

हंसीच ती इतर सर्वहि वायसी त्या,
कीं ती असे हारिणि त्या शफऱ्याच होत्या;
ती विव्हला मृदुलपंकज—चारुगात्री
जों होय संस्तिमित, पाहि पती स्वनेत्रीं

३५

आला तदा अधिक कंठ तिचा भरून,
ती गाय हाय रडली किति हंबरून;
तों राधिका सति पडे पतिच्या गळ्यांत
झाला तई अधिक तो करुणार्द्रचित्त.

३६

क्रोधें उफाळुनी वदे जननी भुजंगी,
कां जारिणीस धरिशी रमणा ! निजांगीं;
दे हांकलूनि सदनांतुनि पापिणीला,
झालास मोहवश कां करुणारवाला ?

३७

तो सावधान करुनी वदला प्रियेस,
हो स्तब्ध तूं, प्रथम सत्वर अश्रु पूस;
माझी चळो न मति आज जनापवादीं
तूं शुद्ध कीं नच विशुद्ध बघेन आधीं !

३८

साध्वी स्त्रियेस पतिदैवत एक आहे,
लोकीं प्रबुद्ध–रसनारस हाच वाहे,
ठावें असेल तुज हें बहुभाषणीला,
कां भाळलीस वद त्या कपटी हरीला ?

३९

चांचल्य कां वरिति हे पद वेणुनादें,
हा नादची तुज अनिर्वच लांछना दे,
ये दृष्टिला चपलता बघतां हरी तो,
लोकांत कां न मग तो अपवाद होतो ?

४०

राधे ! घरोघर तुझी कुजबूज चाले,
जो तो तुझ्याचविषयीं अपवाद बोले,
कां हे तुझ्याचविषयीं उठती प्रवाद,
दे सत्व सिद्ध करुनी मिटवी विवाद !

४१

दुर्गंध कां प्रिय असे कधिं नासिकेला
बीजाविना न जनवाद–तरू उदेला;
निर्दोष पूर्ण असतां मग पापपंकीं–
कां लोटितात तुजला जन, हें विलोकीं !

४२

दावावयास मुख हें मज लाज वाटे,
सर्वत्र ते मजकडे करितात बोटें,
देतात दोष मजला जन मोठमोठे
कीर्तीवरी पसारिले अमुच्या ! सराटे

४३

लोकीं स्वकीय कुलकीर्ति न हो मलीन,
शीलास नित्य जपल्या ललना कुलीन;
झाल्या अनेक वनिता पतिभक्तिमंत;
गाती तयांस अझुनी कुलशीलवंत

४४

झाल्या जिथें मधुर मालति रम्य लीला,
तेथें बहार कुहरी लतिकेस आला;
झाला गुणोद्गम जिथें मधुमाधवींचा,
उन्माद आज दिसतो वन बाभळीचा

४५

आहे भवाब्धितरणी गृहिणी समर्थ,
केलेंच हें वच तुवां, अहहा ! निरर्थ;
संसारमैत्रिण न, तूं असुनी कलत्र
लाभेल केविं तरि गे तुजला ! परत्र

४६

पतीचें शंकानिवारणः—

विम्लान पद्मनयना, श्लथदेहगात्री,
अभ्रंगतेंदुवदना गतभा कुलस्त्री,
मंदाकिनीसदृश वर्तन त्या सतीचें,
शंकानिवारण करूं सजली पतीचें,

४७

सारून दुःख सगळें साति शुद्ध भोळी
नाथापुढें निजकरांजलिबद्ध झाली,
आर्या विनीत विनय प्रगटीत बोले,
" चातुर्य कां कुणि कुणा शिकवून आलें ?

४८

वाणी तशीच वनिता स्थल निंदकांचें,
पाथोधिवीचिसम हा जनसंघ नाचे;
ज्या ज्या दिशीं तरल उन्मुख होय जाया,
ती ती दिशा सहज शक्त न ती फिराया.

४९

लाटेस त्या नमुन घेइन आत्मदेहीं,
तीही तटास भिडतां मग शांत होई;
मोक्षोन्नतीपथ जनाहुन भिन्न आहे,
लोकापवाद गति कां चुकणार आहे ?

५०

सौभाग्यदायक अहो ! तुमचीच दासी,
मी शुद्धबुद्ध पडत्यें तुमच्या पदाशीं;
कां मानितां मज अमंगल वक्रमार्गी,
माझ्यासमान जगतीं न दुजी अभागी !



नाथापुढें निजकरांजलिबद्ध झाली ।

( सर्ग २–४७. )

५१

ठेऊन हात चरणांवरि सांगतें कीं
मी भक्तिबद्ध हारिशीं अति शुद्ध लोकीं,
त्रैलोक्यनायक रमापति एक सत्य,
तो नंदलाल रमतो अमुच्यांत नित्य

५२

आज्ञेमुळें रवि शशी ग्रह तारका या,
कोणी समर्थ न दुजी गति आचराया;
शैलेंद्र हा अचल विस्तृत वारिराशी.
सीमेंतुनी परि न शक्त ढळावयाशीं

५३

ग्रामें अनंत, जन देश किती अनंत,
खंडें अनंत, महिगोल तसे अनंत,
निर्मून त्यांत, भरला, उरला अनंत
तो गोकुळांत वसतो हरि मूर्तिमंत.

५४

एका करांगुलिवरी धरिलें गिरीला.
नाहीं अशी अतुल शक्ति जगीं कुणाला,
मायावि राक्षस किती मुकले जिवाला,
कंसासुरार्थ जगतीं अवतार झाला.

५५

हालाहल स्वहृदयीं, मधु मात्र ओष्ठीं,
प्राणांतकारिणि धरी असुरी महीष्टी;
ती मावशी वधियली स्तन चोखुनीया,
सामान्य त्यास वदते जनता अधन्या

५६

आकाशगामिनि वदे नृपतीस माया,
तूं कांय शत्रु बघसी अपुला वधाया;
तो गोकुळांत सुखरूप असे खराच,
त्या सारखा त्रिभुवनीं नरदेव तोच.

५७

दारांत कल्पतरु इच्छित तर्पिणारा,
ही कामधेनु सदनांत उभी उदारा,
ना कोटि जन्मघटनांतरि जो मिळावा
तो लाभ येथ सहजी मग कां त्यजावा ?

५८

मी पुण्यमार्ग वरितें, तरी पापिणी कां ?
देवाधिदेव भजतें तरि जारिणी कां ?
त्यातें कसे विसरले जन आज चित्तीं ?
ज्या साधु संत गिरिकंदरिं आळवीती,

५९

आत्मोन्नतीविण गती न—दुजी नराला,
तीच्याविना सफलता नच जीविताला
माझ्यापरी भजक आपणही असावें,
ऐशी विनंति करितें अतिनम्र भावें.

६०

आहे जगज्जनक तो, नच जार तो हो !
भक्तीस या "प्रणय" नांव न कोणि देवो !
भक्तीण मी, मज गणा न दुजी समान,
ऐकावयास शकती नच दोष, कान

६१

आणा समक्ष शिवशंकर पार्वतीला,
येवो रमा-रमण तो प्रभु या स्थळाला;
ते सांगतील सगळा मम शुद्ध भाव,
देतील या तनुस भक्त असेंच नांव.

६२

आतांच घेउन उडी यमुनाजलांत,
स्वर्लोकवंद्य जल तें वरितें करांत;
ठेऊन साक्ष रविला शपथक्रियेला,
मी आचरून कळवीन विशुद्धतेला,

६३

तीतें म्हणेन अघहारिणि देवि! गंगे!
शुद्धा असेल जरि ही तनया निजांगें,
आई तरी वसनही न भिजो जलानें,
विश्वास खास उपजो जनतेस तेणें !

६४

काष्ठास आणुनि चिता रचितें तयांची
ज्वाला नभोगत उठे अरुणानलाची ;
सीतेसमान करितें निज देहशुद्धि
होईल ना ? मग विशंकित आत्मबुद्धी

६५

या सर्वसाक्षि वसुधेवरि हात दोन्ही
ठेऊनि मी वदतसें तिजला स्मरोनी,
मत्पापकर्म तुजला दिसलें असेल
होई दुभंग, मज घे उदरीं खुशाल !

६६

येवो सहस्रमुख शेष इथें सुखानें,
त्याला वदेन कर दंश महोग्रतेनें ;
लक्षांत ठेव पण साध्वि जरी असेन,
श्रीमाधवोचित तुझी पदवी हरीन.

६७

जाऊं चला हिमगिरीश्वर पायथ्याला
जो भव्यशीर्ष बघतो सगळ्या जगाला;
त्यातें म्हणेन " तुझिया गिरिजेसमान,
ताता ! नसेन तरि देह करी विचूर्ण "

६८

किंवा कशास इतुके विधि पाहिजेत,
ऐकावयास मुरली-रव सत्य येत;
हे वेणुनाद कसले असतील दूत,
बोलावितात मजला प्रभुशब्द पूत.

६९

द्या जावयास अनुमोदन किंकरीला,
या देहगोपन करून बघावयाला;
निष्पाप भक्त-भगवंत अशा जनांचा,
एकांत येइल दिसून विशुद्ध साचा

७०

निष्कारण स्वललना छळिली भ्रमून
म्यां निंदिलें सतिस, तो हरि नोळखून
ऐसा विचार-पवनोल्लसितांतरात्मा
दिग्मंडळीं भ्रमण तीव्र करीत होता.

७१

विश्वासकारिणि मनोभ्रम हारणारी,
वाणी तिची परम संशय छेदणारी;
शंकानिरास सगळा कळला मनाला,
अंतीं परंतु नव हेतु मनीं उदेला

७२

वस्तुस्थिति स्वनयनें सगळी बघावी,
बोलोत हे जन न मी मग दोष लावीं;
आत्मस्वरूप हरि हा नयनीं दिसेल
ही राधिका असति वा सति, हें कळेल.

७३

देई हंसून अनुमोदन जावयाला,
मागून आपणहि तो वळला स्थळाला,
देहस्मृतींत नव्हती सति राधिका ती
दामोदरस्मरण मात्र करीत होती.

# राधा-माधव

## सर्ग ३ रा.

या सर्गांत आरंभीं दुपारच्या वेळचें वनश्रीवर्णन आहे. गाईमागें हिंडल्यानें गोपाळांस परिश्रम झाले आहेत. तन्निवारणार्थ ते विश्रांति घेत आहेत. श्रीकृष्णाच्या वेणुनादानें त्यांस झोंप लागली आहे. ह्या वेळीं माधवास राधेचें स्मरण होत आहे. राधामाधवाचा भक्ति-समागम पाहाण्याच्या उद्देशानें राधारमण ( राधेचा पति ) एका झाडावर बसला आहे. इकडे दर्शनातुर राधा माधवाचा शोध करीत आहे. दोघांची भेट होत आहे. ह्या वेळीं रमणाला शंका येते व तो माधवासमोर राधिकेची निर्भर्त्सना करून निघून जातो.

( शालिनी वृत्त )

१

यमुनातीरावरील दुपारची वनश्रीः—

आकाशाच्या मध्य-भागावरून
वृक्षांच्या त्या दाट छायेमधून
कालिंदीच्या स्वच्छ आदर्श-तोयीं
डोकावोनी सूर्य रूपास पाही.

२

हस्तांशूंनीं साधुसेव्या नदीला
स्पर्शोनी तैं चंडता ये रवीला.
आकाशीं जी स्वर्ग-गंगा वहाते
तीतें हीची योग्यता काय येते !

३

भक्षोनीया बालसस्यांकुरांतें
कालिंदीच्या प्राशुनीया जलातें.
वृक्षच्छायीं बैसुनी शांताचित्त
गोवृंदांचे चालले ते रवंथ

४

येतां थोडी मारुताची झुळूक
वृक्षांतोनी पर्ण वा पुष्प एक
जेव्हां जेव्हां तें वरोनी गळावें.
धेनूंनीं तैं देह ते हालवावे.

५

चाऱ्ही बाजू झांकल्या पल्लवांनीं
वृक्षच्छाखा आश्रयाळा करोनी
पंखाखालीं झांकुनीया पिलांला
वृक्षीं पक्षी सेविती शांततेला

६

निद्रा घेती, झांकिती पक्षि डोळे
शाखा जेव्हां मारुतें मंद हाले
तेव्हां त्यांचे देह होती विलोल
सांभाळीती जेथला तेथ तोल

७

गाई-मागें हिंडुनी गोप-बाळ
देहीं झाले शांत तैसे मलूल
श्रीकृष्णाच्या मंजु वेणुस्वनांनीं
आनंदानें झोंपले सर्व रानीं.

८

खालीं शांती, व्योम भागांत शांती
जागी होती मात्र ती नीलमूर्ती
ब्रह्मांडाला व्यापुनी राहिली जी
ती कृष्णाची आज मूर्ती निकुंजीं

९

ऐकोनीया माझिया बासरीला
कां येईना राधिका या स्थळाला
दिव्या शांती जी गमे हृत्स्थलाची
गेली कोठें वैजयंती गळ्याची

१०

शैल स्थानभ्रष्टता तो वरील
तैशी सीमा वारिधीही त्यजील
भक्तीणीची भक्ति कां भ्रष्ट होते
होई वंद्या देवयक्षास्त्रियांतें

११

पीयूषाच्या कांतिला लाजवील
क्षीराब्धीच्या शुभ्रतेला हरील
ऐशी जीची भक्ति अत्यंत थोर
घ्यावी कैसी गांठ सर्वांसमोर

१२

सामान्यांना काय दिव्यानुभूती
होतो त्यांच्या बुद्धिला भेद अंतीं
हें जाणोनी श्रीहरीनें समस्त
केलीं तेथें गोपबाळें सुषुप्त

१३

अग्रीं अग्रीं नूतनांकूरमाला
मध्यें मध्यें पल्लवें पल्लवांला
ऐसें कुंजस्थान जें माधवीचें
लोभे तेथें चित्त त्या माधवाचें

१४

तीरीं कांहीं नीर भागांत कांहीं
डोले छाया मंद वायुप्रवाहीं
ऐशा वृक्षीं कोणि बैसे समोर
पाही त्यातें देवकीचा किशोर

१५

होता राधाकांत वृक्षावरी तो
जो शंकेनें श्रीहरीला पहातो
विश्वासानें त्यास तैं ओळखून
अंतर्ज्ञानें जाणिला हेतु पूर्ण

१६

ठावें नाहीं आपणातें जणों कीं
ऐसें दावी त्यास तो सर्वसाक्षी
ब्रह्मांडाच्या नाट्यविद्येंत पूर्ण
बोले तेव्हां आपणाशीं, हंसून

१७

" या वेड्याला व्यापिलें संशयानें
माझी माया जाणिली काय यानें !
दिव्यप्रीती ओढुनी स्वार्थ-मार्गीं
शंका तीची घेतसे हा अभागी

१८

देऊं कां मी तीजला आज दीक्षा ?
पाहूं कां मी भक्तिणीची परीक्षा ?
आला वायू दक्षिणेचा वहात
आला वाटे राधिकादूत येथ ”

१९

दर्शनातुरराधाः—

वायूवेगें राधिकेच्या मुखाचे
ऐकूं येती शब्द भक्तीरसाचे
“ हे गोविंदा ! बालनाथा ! मुकुंदा !
दावीं दावीं बालपादारविंदा

२०

जी ऐकोनी दासि ही ! येथ आली
कां गोपाळा ! वेणु ती मूक केली ?
मातें झाला वेळ जो यावयाला
त्याचा तूंतें राग हा काय आला ?

२१

तूं शांतीचा सिंधु आहेस शामा !
कां कोपावें मंगला ! पुण्यधामा
आहे माझी आज देवा ! परीक्षा
दीनेला या साह्य हो पुष्कराक्षा

२२

मार्गी मार्गी धेनुकांचीं पदें जीं
तीं दावीतीं पादपद्में तुझीं तीं
तीरोपांतीं लागले पाय पंकीं
ते पाहोनी चालत्यें मी विशंकी

२३

संमार्जोनी सुंदरी देहलीला
ज्यांच्यायोगें आणिती शुद्धतेला
त्या या येथें पिंडिका गोमयांच्या
मातें होती सूचका त्वत्पथाच्या

२४

मेघःशामा ! मेघ तूतें गणोनी
नाचोनी ज्या बर्हिणी जाति रानीं
तत्पादांनीं चित्रिता भूमि झाली
पुच्छें कांहीं येथ त्यांचीं गळालीं.

२५

थांबे थोडी पाहुनी ती खुणांना
सर्वेशाला आठवी चालतांना
कालिंदीला पातल्या वीचि-माला
वाटे चित्तीं स्वर्धुनी ही तियेला

२६

गोवृंदांना, भक्त–गोरक्षकांना,
बोले साध्वी दाखवा देव कान्हा
श्रीरंगाच्या पादपद्मास भृंगी
तीरीं तीरीं शोधिते भक्तिरंगीं

२७

राधामाधवाचा समागमः—

ज्या कुंजीं तो नीलरत्नप्रभेचा
सौंदर्याचा मेघ होता दयेचा
त्या कुंजीं जों राधिका पाय ठेवी.
तों ती झाली तन्मया स्वीय देहीं

२८

सर्वेशाला पाहतां दृष्टिभागीं
आले तेव्हां हर्ष-रोमांच अंगीं
आनंदाचें वाहतें नेत्र वारी
बोले ओष्ठीं हे मुरारी ! मुरारी !

२९

केला त्यातें राधिकेनें प्रणाम
आलिंगी तो शुद्धकैवल्यधाम.
मर्यादेच्या लौकिकी बंधनाची
अद्वैताच्या भावनीं शुद्धि कैची ?



केला त्यातें राधिकेनें प्रणामी । आलिंगी तो शुद्धकैवल्यधाम

( सर्ग ३-२६ )

३०

दिव्य प्रीती-योग ठावा न ज्यास
पूतात्म्यांची कां न शंका तयांस ?
सत्प्रेमाला बांधुनी एक जागीं
स्वामी होऊं पाहती ते अभागी

३१

राधा-रमणाचा कोप—

तो राधेचा कांत कोपें जळाला
गेलें त्याचें भान, आला तळाला
कांतेलागीं विश्वनाथा समोर
बोले वाणी कर्णभेदी कठोर

३२

" दुष्टे ! आतां काय पाहावयाचें !
झालें पाप ज्ञात पापी जनांचें
मिथ्या गोष्टी सांगुनी या जनातें
केलें तेजोहीन दोन्ही कुलांतें

३३

गेहीं मातें गोविलें शब्दजालीं
येथें वंध्या वैखरी सर्व झाली
दुष्कर्माचा दाविला कां विपाक ?
' धारिष्ट्याच्या आड लोपे न पाप '

३४

वैरी तैशी जारिणी कर्जदार
हे सत्याचा शब्द कां बोलणार ?
झांकायला पाप, घेतील आणा
पापासाठीं योजिती पाप नाना

३५

श्रीविष्णूचा हाच कां अंशधारी ?
वैकुंठाचा हाच ना तो विहारी ?
ढोंगी भोंदू कार्य साधावयाला
देवत्वाचें स्तोम दावी जगाला.

३६

यानें तूझी कामचेष्टा करावी
त्वद्वृत्तीही कामयुक्ता दिसावी
भक्तीचें कां नांव देतेस यास ?
माझ्या नेत्रीं धूळ कां फेंकितेस ?

३७

वृत्ती ज्यांची मानभावीपणाची
कृत्यें लोकीं सांवळ्या गोंधळाचीं
येतें त्यांना ‘ प्रेम ’ हें नांव देतां
त्याच्या खालीं पाप ये आचरीतां

३८

'सोऽहं कोऽहं' तात्विकज्ञानगोष्टी
कैशी कोणीं निर्मिली जीव-सृष्टि
दोघांमध्यें ऐकुं येतील वार्ता
ऐसा माझा तर्क वाहात होता।

३९

मृत्यूलोकीं स्वर्ग आतां कशाचा
भाळीं आतां मार्ग हा रौरवाचा
पीयूषाचा कुंभ घेतां करांत
तों दुर्दैवें टाकिलें मद्य त्यांत

४०

श्रीरंगाच्या कौतुकाची मदाशा—
होती, आतां तीव्र झाली निराशा !
ज्यानें इच्छा मानसाची करावी
दुष्पंकाची त्यास कां घाण यावी !

४१

'कानांनीं जें ऐकिलें, तें असत्य
डोळ्यांनीं जें पाहिलें तेंच सत्य'
ऐशी लोकीं बोलती सूज्ञ वाचा
नाहीं येथें मार्ग तो संशयाचा

४२

झालें चित्त भ्रांत या स्त्रीचरित्री
कां देई ना ठाव मातें धरित्री ?
नातें झालें नष्ट भार्यापतीचें
चालूं द्या ते खेळ आतां जगाचे

# राधा-माधव

## सर्ग ४ था

" माझ्या परीक्षेची वेळ असतां तूं उगीच पतीला शंकित केलेंस, व मला विनाकारण तूं जनापवादाच्या संकटांत टाकिलेंस, यामुळें तुलाहि संकटांत पडावें लागेल. हा साध्वीचा शाप समज कीं हा तुझ्याच घरचा कायदा समज " असें राधेनें माधवास सांगितल्याचा भाग यांत आहे.

( शालिनीवृत्त )

१

झंझावात ध्वंसुनी पद्मिनीला
जातो तैसा राधिका-कांत गेला
ती नीलाक्षी कोमला अंतरंगीं
पोहे नाना कल्पनेच्या तरंगीं

२

भूमीभागीं भग्नचित्ता पहाते
हातें सारी आपुल्या कुंतलातें
आकाशातें दृष्टि लावून शाम
पाह शांत स्थीर तो निर्विकाम

३

ती विम्लाना अप्रसन्नाननानें
बोले दुःख क्षीण–आर्तस्वरानें

राधेचें कारुण्यः—

" हे सर्वज्ञा ! हे स्थितप्रज्ञ सूज्ञा
तूंतें बोलूं दीन मी काय अज्ञा

४

दीनोद्धारा ! लोकपाळा दयाळा
दुर्दैवी ही मी तुझी एक बाला
व्हावा ज्याचा पूर्ण शंकानिरास
केलें शंकाग्रस्त कां तूं तयास ?

५

यावी शंका ज्यामुळें मत्पतीला
ऐशी झाली कोणती भावलीला
गेल्यें होतें त्वत्स्वरूपीं विरून
मातें ना ती आठवीतें फिरून

६

दुष्कीर्तीची चित्तविच्छेदकारी
आतां निंदा ऐकुं येईल शौरी !
त्याच्यापेक्षां दावुनी दिव्यता ती
माझी केली सिद्ध कां त्वां न भक्ति ?

२८२८

७

‘ कृष्णासाठीं राधिका हीं बुडाली
संसाराची सर्वथा होय होळी
तूंतें जेव्हां ती यशोदा पुसेल
ज्ञानश्रेष्ठा ! काय तें सांगशील ?

८

नंदानेंही बोलवोनी पुढारी
तुम्हा हाच प्रश्न केल्यास शौरी !
भाषाभिज्ञा ! पुंडरीकाक्ष देवा !
सांगा ! सांगा ! काय सांगाल तेव्हां ?

९

शंकास्पृष्ट स्नेहबद्ध स्वमित्र—
माझा भाव ! श्रीपते हा पवित्र
नेणोनी; ते बोलतां कांहिं कांहीं
शंका कोण्या घालवीशी उपायीं ?

१०

लोकांमध्यें शुद्ध कीर्तिध्वजाचा
केला ईशा ! तूंच विध्वंस साचा
नाशोत्पत्ती त्यापरी गूढ—लीला
जाणायाला बुद्धि आहे कुणाला !

११

गोपीनाथा! हेतु कांहीं असेल
त्याच्यासाठीं हा तुझा सर्व खेळ
मोठ्या कार्यी अल्पही दोष झाला
घ्यावें लागे अल्पही शासनाला

१२

मी तोंडानें काय सांगू दयाळा!
मद्भक्तीची जाणशी भावलीला
संकष्टीं त्वां टाकिली दासि पाहीं
संकष्टाचे भोगशी भोग तूंही

१३

हा साध्वीचा शाप वाटो समर्था!
त्वत्सृष्टीचीं बंधनें तूंच कर्ता
जैं झालाशी मानवी देहधारी
पाळावीं तीं लागतीं कैटभारी.

१४

प्रेमें केली याचना ज्या बळीची
पाताळाला घातलें त्यास तूंची
घेशी देहीं दोष—दुःशासनातें
जाशी त्याचें द्वार रक्षावयातें

१५

ज्ञानश्रेष्ठ त्वद्गृहीं विप्र येई
तैं शय्या ना सोडिशी शेषशाई
त्यानें वक्षीं जो पदाघात केला
हृत्स्थानीं त्या ठेविशी लांछनाला

१६

मच्छापाची वेळ येईल जेव्हां
रक्षो माझ्या भक्तिचें पुण्य तेव्हां
माझें माझ्यासाठिं कांहींच नाहीं
राधा झाली गोपनाथा ! तुझी ही

१७

लोकीं निंदा निंदकांनीं करावी
येतां जातां म्यां कशी आयकावी
राहूं कोठें त्याग केला पतीनें !
आपत्तीला तोंड द्यावें कशानें ?

१८

कैशी येऊं गोकुळीं गोकुलेशा ?
कैशी साहूं लोकनिंदापघोषा ?
त्याच्यापेक्षां काननीं वास योग्य
टाळोनी कां टाळितां ये अभाग्य !

१९

भक्षायाला कंदमूलादि येथें–
कालिंदीचें नीरही प्यावयातें
एका वस्त्रें येथ राहीन कृष्णा !
त्वद्ध्यानाची भागवीन स्वतृष्णा

२०

हातामध्यें घेउनी दंडवीणा
लीला-गीतें रम्य गाईन नाना
गातां गातां एकदां आत्मदेह
संतर्पोनी शांतवीन स्वदाह

२१

त्वन्मातेला काय सांगूं निरोप ?
मन्नामानें तीच पावेल कोप
"केला माझा बाल उन्मार्गगामी"
ऐसा मातें दोष लावील धामीं

२२

जो मत्तातासारखा नंदराजा
सांगूं त्याला काय संदेश माझा
"या राधेनें पुत्र उद्वृत्त केला,
या शंकेनें क्षोभ होईल त्याला

२३

धर्मे अर्थे पुण्य–कामें जयाची
दासी झाल्यें, साक्ष अग्न्यादिकांची
गेला स्वामी सोडुनी या तनूला
त्याशीं हेतू राहिला बोलण्याला

२४

कोणी गेहीं जाउनी त्यास सांगा
" आहे दासी सर्वथा निर्मलांगा "
कृष्णा ! जावें त्वां न माझ्या गृहाला
दुर्वाणीला व्यर्थ ऐकावयाला

२५

ज्यांच्या ज्यांच्या वाहिल्या म्यां प्रतिज्ञा
ना व्हावी त्या पावनांची अवज्ञा
त्यांच्याठायीं सत्व कांहीं असेल
या दोषाचें विघ्न ते हारितील

२६

तूं ' श्रीकृष्ण, श्रीजगन्नाथ तूंच
माझी श्रद्धा रोमरोमांत हीच
तूंतें चिंता कांहिं माझी असेल
मिथ्यादोषीं शुद्धता आणशील.

२७

आतां मातें बोलवेना अनंता !
सौख्यै दुःखें तूंच त्यांचा नियंता
जें जें तूंतें युक्त वाटेल शामा !
तें तें साधी भक्तकल्याणधामा !

२८

जेव्हां जेव्हां येथ येशील गोपा !
या दीनेला भेट दे ब्रह्मरूपा !
मेघःशामा ही मयूरी झुरावी
ऐशी माझी विस्मृती ना पडावी

२९

जा गोविंदा !–वाट पाहील माता
ताताला ही व्यर्थ वाटेल चिंता
रानोरानीं शोधिती गोप तूंतें
गाई तैशा स्पर्शती ना तृणातें "

३०

ऐकोनी तीं राधिका–दीनवाणी
तो कल्याणी बोलला चक्रपाणी
ऐकायाला कृष्ण–गंभीर–वाचा
व्योमीं ठाके वृन्द तैं निर्जरांचा

३१

मंदाराचीं हालतीं पुष्पपर्णे
वाटे–' येतीं कीं अजूनी विमानें, !
ऐकायाला ईश्वरी भाषणाला
थांबे थोडा सूर्य अस्ताचलाला

३२

राधेचें शांतुवनः—

"हे कल्याणी तूं परीक्षा स्वतांची
येशी द्याया; घेतली मी हे साची
तोंडानें तूं भक्ति जी गायिलीस
त्या भक्तीला लाविलें मीं कसास

३३

शुद्धौघानें खंडिता हीं न गंगा
त्वच्छापाची तेविं वाणी अभंगा
निर्वैकल्प्यें शाप जो वाहिलास
आनंदानें देवि भोगीन त्यास

३४

उःशापानें तारका तूंच होशी
संरक्षाया शक्ति नाहीं कुणाशीं
मेघश्रेणी–गर्जना कंप देते
ती वृष्टीनें भूमितें शांतवीते

३५

आतां गोष्टी काय होतील पाहीं
चित्तीं चिंता चिंतनीये ! न वाहीं
प्रावृट्–कालीं पूर येतो नद्यांना
त्यावांचोनी शुद्धता काय त्यांना !

३६

जों जों अग्नी लागतो कांचनाला
तों तों येई दिव्यकांती तयाला
आघाताचें दुःख सोसून रत्न
लोकीं पावे मान्यता अप्रयत्न

३७

अज्ञानानें ज्यांस कांहीं कळेना
त्यांच्या घोषें कीर्ति कांहीं मळेना
केला मोठा कृष्णमेघें निनाद
वीजेचें कां होतसे शून्य तेज ?

३८

कोणी मौर्ख्यें रत्न टाकून गेला
अंतीं त्याचें मोल वाटेल त्याला
रत्नानें त्या भावि कालावरील
दृष्टी केव्हां होउं द्यावी न लोल

३९

कालिंदीचा ओघ मागें सरेल !
हा अस्ताचा सूर्य व्योमीं चढेल !
ह्या गोष्टीही शक्य गे एक वेळ
तूंते हा श्रीकृष्ण ना विस्मरील

४०

झाला दृष्टीआड गोपाल–सूर्य
राधासंध्या त्यास पाहे अपूर्व
औदासीन्यें गाढ अंधार होई
आला दैवें भोग ती त्यास साही

# राधा–माधव

## सर्ग ५ वा

यांत आरंभीं वर्षाकालाचें वर्णन आहे. पावसाच्या सरीवर सरी येत असतां यमुनातीरावरील एका कुंजांत विरहिणी राधा माधवाच्या मधुगीतांत गुंग झाली आहे.

वर्षानंतर शरदृतूंत यमुनातीरावर श्रीकृष्ण गोपांसमेत धेनु चारीत आहेत. बांसरीच्या मधुर नादांत सर्व गोप कालिया डोहावर न कळत आले. पुढें कालिया डोहाचें वर्णन असून श्रीकृष्णानें गोपाळांशीं हास्यविनोद करतां करतां एकदम कालिया डोहांत उडी घेतली आहे.

### मालिनी–वृत्त

१

वर्षावर्णनः—

रजतसलिलधारा वर्षती मेघमाला
कनकनिभतनूची दाविते वीज लीला.
"कड कड कड" शब्दें स्तब्ध पृथ्वी जहाली
सकल विहग-जाती शोधिती वृक्षवेली

२

अपरिचलित–गात्रें बैसले जेथ वृक्षीं
फडफड करुनी ते वारिती नीर पक्षी
कलरव मधु आतां कोठला तन्मुखांत ?
प्रळयसमय येतां होतसे मूढ चित्त

३

अगणित जलधारा भूतलीं आपटून
जलकणपटलानें धूम्रता ये वरून
धवल वसन भूनें वेष्टिलें काय देहीं
कटितटिवरि शोभे चंचला मेखला ही

४

ललित तरुलतांच्या पुष्पमाळा गळाल्या
नलिनिसुमनराजी छिन्न विच्छिन्न झाल्या
मलिनसलिलयोगें म्लानता ये तटाला
रुचिरहि यमुनेचें रूप गेलें लयाला

५

उपलविषममार्गा तीव्र जी शब्दवंती
सखल तलविभागीं चंचला वेगवंती
समतटपथपृष्ठीं नीर गंभीर भासे
उपहसित करी कीं मेघपंक्तीस लास्यें

६

कवळुनि शिशु देहीं वल्लभा वल्लभाशीं
वदत वदत गोष्टी, पाहताती नभाशीं
पवनगतजलाचे बिंदु तत्केशपाशीं
धवलतर जणों त्या मौक्तिकांच्याच राशी

७

दशशतकर--राजा सूर्य कोठें दिसेना
अगणितहि तयाची लोपली अंशुसेना
प्रबल म्हणुन सत्ता चालवी मेघराय
घडति अमित जीवां क्रांति-कालीं अपाय

८

हरित–तृण करांनीं चारुनीया मृगांस
फिरविति कर देहीं मानुनी पुत्र त्यांस
मृगशिशु हिमयोगें कंप ज्यांच्या तनूस–
मुनिकुटिज–निवासी आणिती आंत त्यांस

९

पथिकजन निघाला यावयाला गृहातें
सजल जलद त्यातें हाणिती वृष्टिपातें
प्रसृतविटपदेहीं स्थान तेंही मिळे ना
पथिकजन असा हा जाहला दीनवाणा

१०

जललवनिकरांचे एककालीं निपात
जंव नवयमुनेच्या तोयपात्रांत होत
दिसति अमित तेथें तारका बुद्बुदांच्या
जणुं नव टिकल्या त्या वक्षिं कल्लोलिनीच्या

११

चपलतरगतीचे मीन जैं स्वैरचारी–
वर शिर करुनी ते पाहती अंबुधारी
वरुन मग फवारें लागतां आंत जाती
पुनरपि वर याया वाटते त्यांस भीती

१२

कुंजनिवासिनी राधाः—

जलद–समय ऐसा, स्थान तेंही भयाण
'हरि','हरि','हरि', कुंजीं शब्द ये हा कुठून ?
धवलवसनधारी स्कंधवीणाविहारी
'हरि','हरि' वदणारी राधिका पुण्यचारी

१३

निमिलित नयनांची शांतमुद्रा गभीरा
गळति वरुन शीर्षीं पल्लवांतून धारा
करिति सदभिषिक्ता वल्लिका–देवी तीतें
कवण तरि तपस्या साधिते आज एथें ?

१४

गगनिं हरि वसे जो सेविते त्यास राधा
उलट तिथुनि येती, नाम त्यां सत्य धारा !
पथ मुळिं गवसे ना त्यामुळें राधिकेला
सजल घन करीती आर्द्र तीच्या तनूला

१५

सुजनसरलवृत्ति, संतभावप्रवृत्ती
भजकजनसुभक्ती, कीं सदाचारपूर्ती
कविवरहृदयाची स्फूर्ति, वा पूर्ण शांती
सदय बुधमनाची प्रीति राधेयमूर्ति !

१६

अमरसदनशोभा इंदुसच्छीलताभा
हिमगिरितनयेची ही तपस्याई शोभा
रसिकवर बुधांनो ! ओळखा ओळखा हो
विमलहरिसमाधीं मग्न राधा पहा हो !

१७

सकल वसन ओलें भीजला देह सारा
त्रुटितकचकलापीं वाहती नील–धारा
वदनिं करुण गीतें गात होती हरीला;
नयनसलिलधारा लाजवीती घनाला

१८

निखिलगगनचारी–वृंद मेघस्वरूपीं
परिसुनि करुणा ती ढाळिती अश्रु बाष्पीं
ढळढळ रडते ही योगिनीला बघूनी
म्हणुनिच यमुनेला पूर ये रोदनांनीं ?

१९

नृपति–रमणि व्हावी राजभोगीविलासी
नित परिभंवतालीं मैत्रिणी दासदासी
मुदुल सुमनशय्या तीवरीं जी निजावी
अहह ! मृदु तनूची ही दशा आज व्हावी ?

२०

तनुवरि विलसावे शाल किंवा दुशाले
वसन कटिस एक स्निग्ध तेंही जहालें !
अमृतसमरसाचें पान जीनें करावें
विपिनिं निरस तीनें कंदमूलादि खावे !

२१

वसातिस उचिता जी चंदनाच्या महालीं
विजनिं वसतिला ती शोधिते वृक्षवेली
बघुन विषमता ही हात लावून भाळीं
अमरयुवति वाटे सोडिती श्वास खालीं

२२

शरद्वर्णनः—

जलद–समय गेला तो शरत्काल आला
विकसित कमलांला शोधिते हंसमाला
फलवति धरणीची अंगकांती विराजे
सफल करुनि गेले जीस अंभोदराजे

२३

अकलुषजलदात्री पावना सूर्यकन्या
हरिततरुलतांनीं शोभते देवि धन्या
वरुन गगन तोयीं नीलकांत प्रकाशे .
मरकत–मणितेजें सूर्यजा नील भासे

२४

रुचिर विविध वेली पुष्पभारें विनम्रा
मृदुल निजकरांनीं वेष्टिती काननाम्रा
मधुकरमधु—पानीं गुंग गुंजारवानें
परिमल—सुख देई वायु मंदा गतीनें

२५

रजतधवल वाहे अंबु एका तटानें
पदर जणुं सतीनें घेतला हा करानें
मधुन मधुन तोयीं धांवती भोंवरे ते
चलित वसन देवी सांवरी काय हस्तें

२६

विगतघनसमूहें शुद्ध दिक्प्रांत होती
गिरिवर शिखरांचीं तीं शिरें शोभतांती
मणिखचित पिसारे एककालें करूनी
उभवुन शिखि शैलीं शोभती वर्तनांनीं

२७

सकल पुलिनभागीं सारखी भूमि झाली
तिजवरि हरिणांची पंक्ति चालून गेली
युवतिजन सकाळीं स्नानकार्यास गेला
पुलिनपथ तयांना कौतुकस्थान झाला.

२८

यमुनातीरविहारीः—

हरितनवतृणांचे गालिचे शोभताती
चरत चरत तेथें पातल्या धेनुपंक्ती
श्रवणसुखद वाटे बांसरीची लकेर
विलसाति गवळ्यांचीं बालकें सान थोर

२९

मधुर मधुर केका बर्हिणींच्या निमाल्या !
कलरव कलहंसी सोडुनी मूक झाल्या !
त्याजिति तृण मुखींचें वेणुमुग्धा कुरंगी
शिर उभवुन डोले चंदनाची भुजंगी

३०

कवण बटु असे हा वेणुवाद्य-प्रवीण
मधुर मधुर काढी सूर वायू भरून
सरसिजसम देहीं रम्य इंदीवराक्षी
हरिविण दुसरा हो कोण संसारसाक्षी

३१

जननि साति-यशोदा तत्सुखाचा विधाता
जनक बुधसखा जो नन्द तन्मोददाता
नगरजन तयांचें कौतुकस्थान रम्य
कळत न कवणाला रूप त्याचें अगम्य

३२

फिरत फिरत येई कालिया उग्र–डोहीं
मुरलि मधुर–नादें भान कोणा न राही
जवळ जवळ आला राधिका–शापकाल
पुसुनि न पुसवेंही कोरिलेलें कपाळ

३३

*कालिया डोहाचें वर्णनः—

अकरुणं–हृदयी तो बुद्धि ज्याची अशुद्ध
विषधर उरगाचें स्थान लोकप्रसिद्ध
चुकुन विपिन– चारी पाय ठेवी न तेथें
कवण उमजुनी हो ! जाय मृत्युस्थलातें !

३४

घरुन जंव निघाले गाइ घेऊन गोप
फिरुन फिरुन त्यांचे बोलले आइबाप
प्रियकर तनयांनो ! तेथ जावें न कोणीं
न कळत जन गेले ते न आले फिरोनी,

३५

परिभंवतिं न वाढे झाड किंवा झुडूप
तृणहि न उगवे हो ! भीषणीय स्वरूप !
जलचर नच तेथें हिंडती कोस कोस
" वसति अधम जेथें त्रास तेथें जिवांस "

३६

अभिनव यमुनेच्या पापहारी जलांत
गुरुतर भयदाता कां वसावा नितांत ?
खळजन कुणि येवो वा महात्माहि येवो
स्व-पर मति न जीची देतसे एक ठावो

३७

गरलमय, विवर्णी उग्र ज्या वास येई
खळखळ जणुं डोहीं तप्त तें तेल वाही
वरुनि खग न जाती मार्ग सोडून देती
न कळत जरि येती मृत्युची गांठ घेती

३८

करि करिणि वळोनी टाळिती मृत्युभागा
हरिण हरिणि कैंचे तेथ येतील सांगा ?
मग मुरलिधराचा तेथ कां पाय वाही ?
सहज कुणि न जाई काळ ओढून नेई

३९

बनसिधर मुखाची बांसरी स्तब्ध झाली
स्मृतिवर मग तेव्हां मंडळी सर्व आली
अपरिचित तयांच्या भासलें लोचनांतें
स्थल बघुनि अहाहा ! कां न आश्चर्य वाटे ?

४०

गोपालांचा मित्रविनोदः—

म्हणति; " कुणिकडे बा ! पातलों वेणुधारी !
हननकर असावा नाग एथें विषारी
इथुन चल कन्हय्या ! दूर जाऊं निघून
यमपुरिसम बापा ! डोह वाटे भयाण "

४१

कर धरुनि विनंती आग्रहानें करीती
हृदयिं अमित ज्यांच्या दाटली प्राणभीती
स्मित करि वनमाली निर्भयें शांतचित्तें
अभयकरवचांनीं शांतवीलें तयांतें

४२

यदुपति वदला तो भीति कोणा ? कुणाची ?
उगिच करिल बाधा काय शक्ती फणीची
जरि मुळिं शिववीला शेपटीला न पाय
तनुस करित नाहीं नाग कांहीं अपाय

४३

दुरुनि दुरुनि पाहूं कालिया–डोह कैसा ?
मुळिं न जगत कैसा एकही जेथ मासा ?
सहचर वळवोनी कालियादर्शनाला
यदुपति यमुनेच्या पातला तो तटाला

४४

दिसत जणुं असे कीं, मेघ आला सुनीळ
दृषदिं उगवला कीं, नीलवर्णी तमाल
धरणिवर उदेलें आज नीलाब्ज वाटे
सकल सरति मागें, धैर्य याचें न फाटे.

४५

अभयकर करानें बोलवी निर्भयानें
सभय सरति बाले एक एका पदानें
तनु दडवुनि कोणी हस्त हस्तीं धरून
मुख पुढतिं करूनी पाहती ओसरून

४६

'अबब!' वदावि ऐसें रूप तें भीषणीय
सकल शिशु पळाले, जाहले कंपनीय
भ्रुकुटि उभविती ते लाविती हात तोंडीं
म्हणति जिवलगा! बा! सोड ही मृत्यकोंडी

४७

नवल अधिक हें कीं बोलला धेनुपाळ
"जलनिधि यमुनेचे पोहतों सर्वकाळ
जरि सरुन उडी मीं घेतली पोहण्याला
मजसि अनुसरोनी कोण येईल? बोला!

४८

नयन मिटुन कोणी ठेविती हात कानीं
म्हणति तुज कुबुद्धी आज झाली कुठोनी ?
इथुन चल नरेशा ! काय आरंभिलेंस !
कवळुन तुज नेऊं नंदजीच्या घरास

४९

सकल जनमुखाला लाविशी डाग काय ?
सकल पुरजनांना लाविशी काय ' हाय ! '
विकृतमति सुचावी कां तुला नंदपुत्रा !
उपकृत करिं आम्हां हेतु सोडून मित्रा

५०

खळ खळ जल वाहे निम्नगेचें विषारी
वदतिल जन सारे बालबुद्धी मुरारी !
रिझवतिल कुणाला शब्द ? देतील मोद ?
परत फिर इथोनी हा नसे बा ? विनोद

५१

वदति कुणि " अम्ही कीं जाउनी तातमाता
विदित करुन त्यांना आणितों एथ आतां "
जवळ सरुन तेव्हां वेणुधारी म्हणाला
"ढकलित मज होता हाच " सांगेन त्यांला !

४४

दिसत जणुं असे कीं, मेघ आला सुनीळ
दृषदिं उगवला कीं, नीलवर्णी तमाल
धरणिवर उदेलें आज नीलाब्ज वाटे
सकल सरति मागें, धैर्य याचें न फाटे.

४५

अभयकर करानें बोलवी निर्भयानें
सभय सरति बालें एक एका पदानें
तनु दडवुनि कोणी हस्त हस्तीं धरून
मुख पुढतिं करूनी पाहती ओसरून

४६

'अबब!' वदवि ऐसें रूप तें भीषणीय
सकल शिशु पळाले, जाहले कंपनीय
भ्रुकुटि उभविती ते लाविती हात तोंडीं
म्हणति जिवलगा! बा! सोड ही मृत्यकोंडी

४७

नवल अधिक हें कीं बोलला धेनुपाळ
"जलनिधि यमुनेचे पोहतों सर्वकाळ
जरि सरुन उडी मीं घेतली पोहण्याला
मजसि अनुसरोनी कोण येईल? बोला!

४८

नयन मिटुन कोणी ठेविती हात कानीं
म्हणति तुज कुबुद्धी आज झाली कुठोनी ?
इथुन चल नरेशा ! काय आरंभिलेंस !
कवळुन तुज नेऊं नंदजीच्या घरास

४९

सकल जनमुखाला लाविशी डाग काय ?
सकल पुरजनांना लाविशी काय ' हाय ! '
विकृतमति सुचावी कां तुला नंदपुत्रा !
उपकृत करिं आम्हां हेतु सोडून मित्रा

५०

खळ खळ जल वाहे निम्नगेचें विषारी
वदतिल जन सारे बालबुद्धी मुरारी !
रिझवतिल कुणाला शब्द ? देतील मोद ?
परत फिर इथोनी हा नसे बा ? विनोद

५१

वदति कुणि " अम्ही कीं जाउनी तातमाता
विदित करुन त्यांना आणितों एथ आतां "
जवळ सरुन तेव्हां वेणुधारी म्हणाला
" ढकलित मज होता हाच " सांगेन त्यांला !

५२

मथन करिल आजी शेषशाई फणीचें
म्हणुनि गगनयानीं वृंद आले सुरांचे
श्रवण–सुखद झाला बालभाषाविनोद
स्मित सुर–वदनीं कीं श्वेतवर्णी पयोद

५३

हृदय–निहित माझें कालियाचें विशल्य
उपटिल फणिशाई शक्ति ज्याची सुभव्य
म्हणुनिच यमुना ही हांसते कीं तरंगीं
" प्रभुविण चिरदुःखें कोण लोकांत भंगी ?

५४

लववुन वपु डोहीं कृष्ण रोंखून पाही
अहि चमकवि तोही आपुले नेत्र दोन्ही
उफळुन बहु दावी देहचांचल्य-लीला
" निधनसमयिं पावे जीव उन्मादतेला "

५५

घडि जंव परिपूर्णा होय शापावधीची
त्रुटित जंव अहीच्या रश्मि झाली वयाची
सरुन सुखद वेळा प्रीतिंची ये परीक्षा
तंव खलदलभंजी तो उडे अंतरिक्षा

५६

कालियांत उत्पतनः--

नवजलधरमाला भेदुनी उंच गेला
हटवि गगनचारी देव वैमानिकांला
गरुड उडत आला सारिलें दूर त्याला
सर सर मग आला कालियाच्या शिराला

५७

तुटुन जणुं नभींचा गोल खालीं पडावा
गिरिवर-शिखराचा कीं कडा कोसळावा
दशदिशिं भरणारा नाद झाला अपार
वरतिं उसळलें तें अंबरीं नीर फार

५८

जलतटयुगुलाशीं थोर लाटा उडाल्या
पुलिनमय तटाच्या सर्व भूमी बुडाल्या
अहिवर-खलहंता एकदां जो बुडाला
पुनरपि न दिसे तो आंतल्या आंत गेला !

# राधा-माधव

## सर्ग ६ वा

' श्रीकृष्ण कालिया-डोहांत बुडाला, ' असें म्हणत सर्व गोवळ्यांचीं मुलें गोपुराकडे धांवलीं. नंदयशोदेसह सर्व दुःखी गोप यमुनेवर आले. यशोदेचा आक्रोश चालला आहे तोंच नारद अवतरले. ' कृष्णावर ज्याचें शुद्ध प्रेम असेल त्याच्या हाकेसरसा श्रीकृष्ण वर येईल ' असें ते म्हणाले, तेव्हां अनेक व्यक्ति पुढें सरल्या. शेवटीं नंदयशोदा व बालमित्र पेंद्या ह्यांनींही आळविलें, पण श्रीकृष्ण मूर्ति वर आली नाहीं. हा भाग या सर्गांत आहे.

( वंशस्थ-वृत्त )

१

गोपालांची धावाधावः—

सरिज्जलीं पाहुनि कृष्णपातता
भयें पळाले सगळे इतस्ततां
भयार्तशब्दाकुल बालकें तशीं
चहूंकडे धांवति तीं दिशीं दिशीं

२

अहो ! बुडाला हरि कालियाजलीं
चला ! चला ! सत्वर सर्व त्या स्थळीं
" हरी हरी " यापरि शब्द बोलती
विलोचनांतून जळास गाळिती

३

भयार्त वार्ता श्रवणीं प्रवेशली
पुरावरी वीज जणूं कडाडली
त्वरा करूनी जन ते पुंढें पुढें
वनीं निघाले शिशुवृद्ध बापुडे

४

अशी कशी ओढवली अरिष्टता ?
परस्परां सांगति गोप धांवता
यथार्थता वर्णिल काय ती कवी ?
अनर्थता मानवबुद्धि कांपवी

५

यशोदेचा शोकः—

यदा यशोदेप्रति वृत्त तें कळे
उठे त्वरेनें. यमुनेकडे पळे
जशी स्ववत्सास्तव धेनु हंबरे
विलाप तो ऐकुनि चित्त घाबरें.

६

" अरे ! कन्हया ! व्रजलाल सुंदरा
कशास गेलास भुजंगकंदरा !
कुठें बघूं मी तुजला मनोहरा
तुझ्याविना ना जगतांत आसरा

७

कशी तुझी श्यामल मूर्ति गोजिरी
मदीय नेत्रास दिसेल बा ! हरी !
नको, नको या भुवनांत राहणें
तुझ्याविना नीरस वाटतें जिणें

८

प्रभातकालीं विपिनांत चालला
दिसे सुमूर्ती तितुकीच ती मला
पुरी शिदोरी नव्हतीच बांधिली
घडी नसावी निघण्यास चांगली "

९

रडे, मुखीं अश्रु पुनः पुन्हां पुसे
म्हणे–किती जान्हवि कोस ही वसे ?'
स्वपक्ष दैवें असते तिला जरी
उडून आली असतीच सत्वरीं

१०

पुरी तटीं येउन सर्व पातली
तिच्यासवें ती यमुना रडे जलीं
रडे यशोदा नृपनन्दही रडे
किती सडा सैकतभूवरी पडे

११

नदी पवित्रा सुरगायनोचिता
परंतु तेथें जडली मनोव्यथा
अलोट जें रोदन तेथ चाललें
खरेंच कल्लोलिनि नाम शोभलें

१२

तरंग तेथें विकलांतरीं किती !
तरंगिणी शोभत नाम तीप्रती
विलोचनीं निर्झर वाहतां जलीं
नदी खरी निर्झरणीच शोभली

१३

कुणी कपाळावर हात ठेविती
कुणी उराशीं निजहस्त लाविती
अधोमुखी होउन अश्रु गाळिती
अशांतता नांदतसे नदीतटीं

१४

" हरे ! मुरारे ! व्रजलोकसुंदरा !
कशी यशोदा त्यजिली ! शुभंकरा ! "
पडे उठे, हात पुढें करी सती
न पाहवे ताद्विकलांग दुःस्थिती

१५

विशाल लाटा उठती क्षणोक्षणीं
कुमार याया करि यत्न आंतुनी
विशालदेही कुणि आंत जाउनी
करी न कां साह्य तदीय रक्षणीं ?

१६

असेल बाई ! धरिला अहीश्वरें
करीत आहे श्रम यावया त्वरें
कुठें महाव्याघ्र कुरंग तो कुठें !
वृथा मदाशा, उर हें जणो फुटे

१७

चला, चला या मज मार्ग सत्वरीं
तयास मी घेउनि येतसे वरीं
करील देहीं जरि दंश कालिया
शरीर जावो तनयासवें लया

१८

सती तदा आवरितां न आवरे
जनांतरीं तद्वच पाडिती घरे
प्रमोहचित्ताकुल नन्द गोवळी
पुसे "कुठें हो! मम मूर्ति सांवळी"

१९

नारदाचें आगमन

न ऐकवे, ना बघवे मनोव्यथा
विभूति येई सुरमंडलागता
करांत वीणा मुखिं कृष्णमाधुरी
शरत्-शशीकांति दिसे तनूवरी

२०

शिरोज अंभोरुहकांत मोहक
धृतोपवीता भवपुण्यकारक
अतर्क्य केव्हां उतरे नभांतुनी
कळे न कीं द्दक्पट ये विभागुनी

२१

असंख्य कुंदोद्भव भव्य चारुता
हिमाद्रिची प्रस्फुट कीं विपाकता
गमे मनाला कुमुदावली फुले
नभांतले कां शशिरत्न पातलें ?

२२

त्वदागमीं उल्हसिता वसुंधरा
घडो तुझें स्वागत नारदेश्वरा !
ऋषे ! तुझ्या आगमनें विकासती
विदग्ध आशाललिता–लता किती !

२३

प्रमोहिता स्निग्धमलूल लोचना
ललाट–शिंदूर विमार्जितानना
मुनीश्वराच्या चरणास वंदिती
परोपरी गोपि कथा निवेदिती

२४

विकीर्णकेशा, श्लथदेहधारिणी
स्वपुत्रदुःखक्षताचित्तरूपिणी
क्षणोक्षणीं श्वास-समीरविक्लवा
अशी यशोदा नमिते शुभंभवा

२५

यशोदेची विनवणीः—

निजाश्रुतोयेंच महासतीश्वरी
मुनींद्रपादद्वय धूत ती करी
जितेंद्रियश्रेष्ठ सुराग्रणी मुनी
परंतु गेला अगदींच मोहुनी



तपोबलानें तनयास वांचवा ।
प्रभो ! कन्हया मजलागिं भेटवा ॥

सर्ग ९-२६

२६

यतीवरा ही घडली अधोगती
करा अभाग्येवर पुण्यसत्कृती
तपोबलानें तनयास वांचवा
त्वरें कन्हय्या मजलागिं भेटवा

२७

वृथा नसे ही स्तुति योगराजया ?
अशक्य तुम्हां जगतांत काय या ?
कृतांत काळास उभाच ठेवुनी
कराल दीनावन सत्य या क्षणीं

२८

उपाय कांहीं करुनी शुभंभवा !
मदीय जीवाश्रय पुत्र दाखवा
अतींद्रिय ब्रह्मविदग्रणी हंसे
महंतहास्यांत सुभव्यता वसे

२९

नारदाचें समाश्वासनः—

वदे मुनी 'पुत्रवती शुभानने '
सुरादिकांनीं तव पाद सेवणें
न पुत्र हा कृष्ण जगत्पिता असे
त्वदीय मातापद सान ते नसे !

३०

समस्त पृथ्वी बुडवील जो हरी
बुडेल कैसा प्रभु तो जलांतरीं
तुम्ही बुडालां सगळे भ्रमांतरीं
अशी कशी ही निजबुद्धि बावरी

३१

प्रमत्त झाला नृपकंस एथला
तया वधाया अवतार जाहला
नव्या नव्या या बघुनी चमत्कृती
न ओळखीला अजुनी रमापती

३२

तुम्ही सुखी गोकुललोक व्हावया
करी स्वदेहांतुन मुक्त कालिया
फणेवरी नाचतसे जगत्पती
म्हणून लाटा उठतात भोंवतीं

३३

पहा सुरांचे ध्वनि वाजती वरीं
सुखी असे माधव कालियावरी
जलांत कल्पद्रुम-पुष्पमालिका
नभांतुनी टाकिति देवबालिका

३४

असंख्य–चंडांशुमयप्रभावती
अजून कां वैष्णव मूर्ति ये न ती
असेल यत्प्रीति नितांत निर्मला
खरा तदीयांकित देव सांवळा

३५

तयें जरी बोलविला स्तवांतरीं
सरोजनेत्री तरि येइ सत्वरीं
कुणावरी प्रीति तदीय ती तरी
असे परीक्षाच अजी तिची खरी

३६

विदग्धभूमीवरि वारिवाहक
सुवृष्टिनें शांतवि उग्रपावक
तसा त्रिलोकांतरचारि नारद
प्रशांतवी संस्कृत वाग्विशारद

३७

कृष्णाची आळवणीः—

स्वकंठवीणा मधुरा उदीरिता
चतुर्भुज–श्रीपतिकीर्तिसंस्तुता
अशा अशा व्यक्ति अनेक धांवती
यशस्वितेचें फल सर्व वांछिती

३८

मुखांत घ्या प्रेम वदून लाघवी
परंतु त्याची शिवली न ज्या चवी
अशा जनांचे थकले किती थवे
अनेक येती पुढतीं नवे नवे

३९

अहंमतीचा अभिमान वाढला
विकार बुद्धींत अपार दाटला
" हरी ! हरी ! " बोलुन पाय काढिती
अधस्थलातें विरमून पाहती

४०

न होय ज्यांला हरिची कधीं स्मृती
प्रसंग येतां हरिनाम बोलती
बळेंच पाणी नयनांत आणिती
परंतु त्यांची गति होय तीच ती

४१

सदा निजार्थी परमार्थ वांछीती
जनांत भारी " हरिभक्त " शोभती
सुशुभ्र ऐसे बगळेहि डोलले
पुढें पुढें दांभिक लोक चालले

४२

करूं विनंती अतिलीन ईश्वरा !
प्रजापते ! दर्शन दे शुभंकरा !
अम्हीच विप्रोत्तम दास सेवक
परी न दे दर्शन गोपनायक

४३

भक्तांगणीं सेवक-सैन्य भागतां
पुढें सरे नायक नन्द तो पिता
मदीय बा ! सुंदर कृष्ण राजया !
मदंक हा भूषविं ! सत्वरीं सया !

४४

अवश्य तो केशव गोकुलेश्वर
स्वदेहरूपें प्रकटेल सुंदर
म्हणून डोळे तिकडेच लागले
खळाळलें नीर, न तीर हाललें

४५

वदे यशोदा सति नन्दकामिनी
मदीय तें प्रेम वदूं कसें जनीं
तुझीच माता, मम पुत्र तूं हरी
परस्परांला उपमा न दूसरी

४६

मुला ! तुला मीं नवमास वाहिलें
स्तनांतलें दुग्ध मदीय पाजिलें
कडेवरी खेळविलें तुला मुला !
क्षणांत ये ! ये ! वर, तोषवीं मला

४७

खराच जंबूजनितश्रि सांवळा
रथांगपाणी उसळेल या स्थला
चलत्सरोजाक्षिणि गोपिका तटीं
दिसेल मूर्ती म्हणुनी विलोकिती

४८

सरिज्जलौघोदित दर्शनप्रदा—
विभूति नाहीं दिसली तरी तदा
सुमित्र पेंद्या उरला तयाकडे—
अपेक्षितार्थी जनदृष्टि ती वळे

४९

महामहा गोपुरवासि धांवले
तिथें उभें प्रेमळ एक बाहुलें
विनोद तत्प्रीतिवचांत थाटला
सुहृत्सखा तो तरि काय बोलला

५०

" इथें अम्हां आणुन तूंच गोकुळा !
स्वदेह ऐसा सलिलांत घातला
पुन्हां परीक्षा अमुचीच या स्थला
नव्हे गड्या ! हा तव खेळ चांगला

५१

तुला " हरी ' नारद बोलती मुनी
हरून चिंता तरि सार्थ हो जनीं
करून चोऱ्या दहिंदूध भक्षिलें
अम्हीं न ऐसें पण तोंड झांकलें

५२

सवंगड्या ! प्रेमळ मी तुझा गडी
करीं मदर्थीं व्रजनाथ ! तांतडी
जगांत मैत्री-फल दिव्य लक्षणी
तुझ्या कृतीहून ठरेल या क्षणीं

५३

मनोहरा ! शेवटचें निवेदन
मनोहरा ! शेवटचेंच भाषण
अतां कुणाची उरली न हांक ती
बघावयाचा तरि अंत हा किती ? "

५४

समस्त भावोदधि मंथिती बळें
न नीरमग्न प्रभुरत्न लाभलें
विचार सर्वांस पडे मनोमनीं
स्वतांस घेती जन दोष लावुनी

# राधा-माधव

## सर्ग ७ वा.

नंदयशोदेच्या हांकेनेंही श्रीकृष्ण वर आले नाहींत. तेव्हां सर्वांना मोठा विस्मय वाटला. शेवटीं वनवासिनी राधा अकस्मात् तेथें आली, नारदानें तिला सर्व वार्ता कळविली व पुढें ते म्हणाले, 'राधिके, श्रीकृष्णावर जर तुझा शुद्धभाव असेल तर तुझ्या हांकेनें तो वर यावा.' राधेनें हात जोडून कृष्णाची प्रार्थना केली व म्हणाली 'जनतेनें माझा तुझ्याशीं विकृत संबंध जोडिला आहे, पण मी जर तुझी शुद्ध भक्तीण असेल तर यावेळीं वर ये, व मला जनापवादांतून सोडीव." त्यासरसी कालियाविहारी कृष्ण मूर्ति वर आली! हा भाग या सर्गांत आहे.

१

सिद्धाश्रमी निर्जन काननाचे
वाचेंत ज्यांच्या हरिनाम नाचे
रुद्राक्षमाळा धरिली जपाला
अशांसही प्रश्न कठीण झाला

२

स्वर्गास जे भूषणभूत योगी
तेथें उभे स्तब्ध हरीवियोगी
ज्यांच्या निवासें महि होय धन्य
चिद्रूप पाहूं म्हणती अनन्य

३

कल्पद्रुमाचें फल अर्पिताती
जे कामधेनूसम तोष देती
चिंतामणी ते नररूपधारी
पाहूं सखा इच्छिति ते मुरारी

४

ज्यांचीं यशें निर्जर–मंदिरांत
शैलेंद्र सांगे नित उंच होत
देवांगना ऐकुन नाचतात
गाती मुखानें यश तें पवित्र

५

जे शोभती दंडकमंडलूंनीं
जे शोभती भस्मविलेपनांनीं
ताऱ्यांत जैसा रमणीय चंद्र
ऋषी समाजीं विलसे मुनींद्र

६

आतां स्वतां नारद बोलवील
आशा उदेली सकलां विशाल
“ सामान्य लोकीं भ्रम होय तेव्हां
महज्जनांना भजतात जेव्हां ”

७

मुनींद्र तेव्हां वदला जनांतें
कोणी नसे कां हरिभक्त एथें ?
आहे मला ठाउक एक मूर्ती
लोकीं वृथा यद्व्यभिचारकीर्ती

८

शुद्धांगना शुद्धमनःपवित्रा
वाटे परी दूषित लोकनेत्रां
जी भावशुद्धा कळली विभूला
चमत्कृती दाविल ती तुम्हांला

९

स्मिताननें पूर्व दिशा वदे हें
'श्रीनारदाचें वच सत्य आहे
भक्तीण राधा तुमची पहा ही
संरक्षुनी सोपवित्यें विदेही'

१०

भाकिणी राधाः—

आली उषा ही उदयाचलाला
ज्योत्स्ना जनांला सुखवावयाला
पीयूषधारा धरणीतळाला
ही वर्षली काय गमे मनाला

११

कुंदद्रुमाचे फुलले बगींचे
उद्यान तैसें कुमुदावलीचें
दुग्धोदधीची नवफेनमाला
राधा तशी ती गमली जनांला

१२

निधान साऱ्या सुरमानसांचें
पावित्र्य साऱ्या अवनीतलाचें
वेदांतशास्त्रोक्त मनःप्रशांती
आल्हादिनी शीतल चंद्रिका ती

१३

रंभाप्रतिस्पर्धिनिरूप रामा
गंधर्वरामानिकरीं ललामा
झाली कृती ही सफला विधीची
दुजी नसे याविण योग्यतेची

१४

निर्भूषणाशुभ्रगृहीतवस्त्रा
करांत वीणा मुखिं कृष्णगीता
साधूजनीं भक्तिरहस्य दावी
तीची स्तुती मीं किति हो वदावी !



निर्भूषणा शुभ्र गृहीतवस्त्रा ।
करांत वीणा मुखिं कृष्णगीता ॥
सर्ग ७-१४

१५

हे कृष्ण ! हे कृष्ण ! हरे मुरारी !
तल्लीन राधा हृदयीं, शरीरीं
पाहे स्फुरूं नारदहस्तवीणा
ये स्फूर्तिही त्यापरि सत्कवींना

१६

राधेस निवेदनः—

" राधे पहा ! हा जनसंघ नेत्रीं
डोहांत आहे तव कृष्णमूर्ति
आहेस तूं भक्तशिरोमणी गे !
येईल तो त्वद्वचनें सवें गे !

१७

हे धर्ममार्तंड ! पुराणशास्त्री
विद्वत्सभामंडित वेदसूत्री
हे गोप, हा नन्द, तशी यशोदा
विश्रामले बोलवुनी मुकुंदा

१८

भक्ती नसे वाङ्मयभाषणांत
भक्ती असे उत्कट भावनेंत
त्वद्भक्ति कृष्णावरतीं अमोल
तुझ्या वचानें हरि पाविजेल

१९

त्वत्कृष्णभक्ती वदते मला कीं
येईल गोविंद तुझ्याच हाकीं
हो नाव तूं या बुडत्या जनांची
तुझ्याकडे दृष्टि असे जयांची

२०

साधु स्वतांला म्हणवून घेती
वृथा तुला “ जारिणि ” नाम देती
नेत्रीं तया अंजन घालण्याला
आली तुला ही अनुकूल वेळा ”

२१

पीयूषधारा, रमणीय तारा
वाराणशीची तटिनी उदारा
जी कृष्णभक्तीमधुगंधधारा
ती गोपराधा वदली गभीरा

२२

राधेचा निराभिमानः—

मुनीश्वरा ! मी मुरलीधराची
भृंगी असें तत्पदपंकजाची
बोलो कुणी येइल जें मुखाला
लाभे फलप्राप्ति शुचिर्मतीला

२३

रात्रंदिनीं छंद मला हरीचा
मेरू ढळेना मम निश्चयाचा
ध्रुव स्थलापासुनि पात होवो
वाचेंतुनी नांव परी न जावो

२४

कृष्णारविंदीं रतली स्वभक्ती
आसक्ति गेली वरिली विरक्ति
रात्रंदिनीं एक मनास छंद
" गोविंद गोविंद हरे ! मुकुंद ! "

२५

कैची विवक्षा कसली तितिक्षा
शिक्षा कशाची कसली परीक्षा
वक्षांत रात्रंदिन शब्द चाले
लक्षांत येई नच कोण बोले

२६

कर्तव्य जें मानवजीविताचें
त्याचे प्रभूला उपकार कैचे
विश्वास चित्तामांधें भावनेचा
झाल्यावरी श्रीहरि दूर कैचा

२७

मानून आज्ञा तुमची सकाम ।
सप्रेम दासी करिते प्रणाम ॥
दामोदराला करिते विनंती ।
आशी असावी तुमची मला ती ॥"

२८

राधिकेचें कृष्णस्तवन—

"श्रीपाद ! हे श्रीधर वासुदेवा ।
संकर्षणा ! लुब्धक भक्तिभावा ! ॥
नारायणा ! नन्दकिशोर ! श्यामा !
दामोदरा ! मंगल पूर्णकामा !

२९

श्रीनाथ, हे श्रीपति कैटभारी ।
गोविंद ! गोविंद ! हरी ! मुरारी !
हे पुंडरीकाक्ष ! जगन्निवासी ।
वैकुंठनाथा ! भवदुःख नाशीं ।

३०

गोपाळ कृष्णा ! मधुसूदना ! बा !
विश्वंभरा ! माधव ! पद्मनाभा !
दुःखाब्धिहारी ! करुणार्द्रसिंधो ॥
ब्रह्मांडनाथा ! भवदीनबंधो !

३१

तूं तात माता निजबंधु तूंच ।
आप्तेष्ट तैसा निजमित्र तूंच ॥
आशामनीषा–कमनीयरूपा ? ।
तूं बा ? गुणोत्कर्ष सदा अपापा ।

३२

तूं स्वर्गलोकेश्वर ! देहधारी ।
लोकीं तुला बोलति वेणुधारी ॥
नाशावया दुष्ट मदांध पापें ।
तूं सेविलें गोकुळ कृष्णरूपें

३३

सोडून पाणी सगळ्या सुखांशीं
शोधीत योगी बसले उपाशी
सहस्र वर्षें दिसशी न त्यांला
केलें तुवां पावन गोकुळाला

३४

लागे सहस्रानन वर्णण्याला
तो शेवटींही थकला दयाळा !
तेथें कशी मी तव कीर्ति गाऊं ?
कोण्या परीनें तुज आज बाहूं ?

३५

आकाशगामी रविचंद्र तारे
पाथोधि शैलेंद्र न हालणारे
आज्ञा तुझी संतत पाळितातो
आज्ञा कशी मी तुजला करूं ती

३६

तूं मृत्युलोकीं अवतारधारी
कां सेविली विन्मुखता मुरारी ?
येशील हांकेसरसा म्हणून
बोलावित्यें होउन मी विलीन

३७

ना हालशी, डोलशि बालकृष्णा !
लागे समस्तांस तुझीच तृष्णा
माझी जरी घेशिल बा परीक्षा
लागेल द्यावी तुजला परीक्षा

३८

असेन सीतेसम पापहीना
साध्वीपणाचा जरि सत्य बाणा
श्रद्धाविशुद्धा सति सारसाक्षी
वदे मुखें वंदुनि सर्वसाक्षी

२८२६

३९

माता यशोदा तव देवकीही
मीही पवित्रा तसलीच देहीं
'भक्तीण राधा जरि भावशीला
तूं निश्चयें येशिल विश्वपाळा'

४०

संबंध माझा भलता तुझ्याशीं
हे जोडिती दुर्जन पापराशी
असेल मिथ्या जरि पापवाणी "
येशील तूं धांवुनि चक्रपाणी

कालिया-विहारी—

४१

तेव्हां चमत्कार अपूर्व झाला
फणींद्रहंता उदयास आला
संपन्न तेजोनिधि श्याममूर्ति
पाहून धाले जन ते स्वचित्तीं

४२

अनंत सूर्यावलि सुप्रकाशे
आकाश, पृथ्वी-तल एक भासे
त्या संप्रकाशीं मति गोंधळून
हा स्वर्ग कीं पृथ्वि न ये कळून

४३

स्वर्गांतही दुंदुभि वाजतात
गंधर्वनारी करितात नृत्य
मंदारपुष्पें गळतीं वरून
आनंद गेला गगनीं भरून

४४

विस्तीर्ण पात्रांतिल वालुकेचे
गाऊन झाले कण रक्त साचे
तैसें शुकाचें मुख लाल होई
सोडी न कोणी, हरि नाम गाई

४५

उत्कृष्ट पीतांबर तो कटीला
हस्तीं गदा, चक्र सुपद्म त्याला
आपादलंबी गळिं वैजयंती
दैदीप्यवंती पसरे सुकांती

४६

भक्ती-रसाचा भरला समुद्र
फुटे सुधासागर कीं समग्र
सौंदर्य सर्वस्व तिथें विलासे
गातों परी तृप्ति न लेश वाटे

४७

हंसीं, मयूरी करितात नृत्य
मंजूळ कंठीं खग गानसक्त
वाचाविहीना खगधेनुपंक्ती
आल्हादवृत्ती वरितात चित्तीं

४८

गोपी द्वितीयेंदुसमानना त्या
पूर्णेंदुशोभा प्रकटीत होत्या
त्यांच्या प्रभेनें सुरबालिकाचें
ये ना दिसोनी मुखतेज त्यांचें

४९

मोठें तुझें भाग्य खरेंच बाई !
गंगा मिळाया यमुनेस पाही
ना लाभ लाधे मथुरास्थलाशीं
क्षेत्रप्रयागीं पडली गळ्याशीं

५०

रत्नादि लक्ष्मी जलधीतळाची
संवर्धि शोभा मुकुटप्रभेची
माहेरवासाहुन ती शुभांगी
येऊन बैसे पति–उत्तमांगीं

५१

अद्रींद्र जो तद्हृदयांमधून
संतोष वाहे जलरूप पूर्ण
ब्रह्मा तिथें मानसिं तोष पावे
प्रेमौघ तो ब्रह्मनद प्रवाहे

५२

ती मूर्ति तो काळ पहावयाला
लाधेल आतां कवण्या जनाला ?
हे देवि गे ! भारतभूमि माते !
धन्या गमे तूं सगळ्या जगातें

५३

गांठीं असावें अतिपुण्य जेव्हां
घडे तदां भारत-जन्म तेव्हां
तो भाग, कीं घे हरि जेथ जन्म
वांट्यास आला तरि धन्य ! धन्य !

५४

ते गोप ते नन्द सती यशोदा
सीमा न त्यांच्या उरली प्रमोदा
वैराग्य वेषस्थित राधिकेची
लागे समाधी हरिभावनेची

५५

होतीं जनां जी अपवित्ररूपा
ती देवि वाटे सकलां अपापा
तत्कान्त गेला हृदयीं विरून
सासूहि झाली अगदीं विलीन

५६

पावित्र्य तीचें कळलें जनांला
तेव्हां सतीचा अपवाद गेला
श्रीकृष्ण नामोत्तर नाम ' राधा '
गाऊन संहारिति पापबाधा

५७

दुष्कीर्तिरूपा अपवादराशी
बुडून गेल्या यमुनातळाशीं
थाटून संसार पुन्हा पतीचा
ती वाजवी दुंदुभि सद्यशाचा

\+ + + +

५८

अंबोधि हा मानव जीविताचा
त्याच्यांत लाटाहि सुखासुखाच्या
भक्त प्रभूचा स्थिर कर्णधार
अंतीं स्वसत्वें वरि पैलतीर

५९

मातापितामित्रजनापरीस
सद्भक्त ज्या आवडती हरीस
तद्भक्तिचा सत्कविता–प्रसाद,
वांटी बुधांना कवि हा 'प्रसाद.'

# माधवी टीका.

ह्या पहिल्या सर्गांत ६४ श्लोक आहेत ते सर्वहि स्वागता वृत्ताचे आहेत. स्वागता वृत्ताचें लक्षणः—

स्वागता पदिं धरी अकरांतें ।
रा न भा ग ग असा क्रम जेथें. ॥

असें आहे. हें वृत्त साधारणतः अद्भुत रसास अनुकूल आहे. पहिल्या ६ श्लोकांत भगवान् कृष्ण गोकुळांत नंदाच्या घरीं प्रगट झाल्याचें वर्णन आहे. हे श्लोक वाचतांना पुढील वामनी पद्यांची स्मृति होतेः—

प्रगटलासि तूं नंद गोकुळीं ॥ म्हणुनि इंदिरावास या स्थळीं ॥
सकळही सुखी या व्रजीं हरी ॥ विरहदुखिःता गोप सुंदरी ॥
अहो धन्य गौळी अहो धन्य नंद ॥ व्रजीं सर्वही धन्य हा प्राणिवृंद ॥
अहो भाग्य यांचें अहो भाग्य यांचें ॥ सखे सोयरे ब्रह्म श्रीकृष्ण ज्यांचें ॥

पुढें ७ ते १४ श्लोकांत प्रभातीं श्रीकृष्णास जागृत केल्याचें वर्णन आहे. हें वर्णन वाचतांना 'घनश्याम सुंदरा श्रीधरा' ह्या अत्युत्तम भूपाळीचें एकदम स्मरण होतें. श्लोक १५ ते ३२ येथें श्रीकृष्ण गोपरूपानें गाई चारण्यास जात असल्याचें व गोपी पाणी भरण्यासाठीं यमुनातीरावर आल्या असल्याचें वर्णन आहे. मागून राधा आल्याचें श्लोक ३३ ते ४३ त सांगितलें आहे. पुढें ४४ ते ६४ मध्यें त्यांच्या भेटीचें व यमुनातीराचें वर्णन केलें आहे. वर्णनांत निसर्गशोभा जनसंमर्द पशुपक्ष्यांच्या लीला इत्यादि गोष्टींचा अंतर्भाव केला आहे.

( १ ) अधीश्वरः—सार्वभौमराजा. होय–प्रगटला. नंद–गोकुळांतील गोपांचा प्रमुख–राजा. प्रभु–भगवान् विष्णु. ह्या श्लोकांत अद्भुतरस मानावा.

( ३ ) नेति–नेति=न+इति=हें नाहीं हें नाहीं अशा प्रकारें भगवत् स्वरूपाचा निर्णय होत नाहीं अशा अर्थी वेदांत अनिश्चित वर्णन आहे; सगुणाचें–माणसाचें; मथुरा–कंसाची–श्रीकृष्णाच्या मामाची राजधानी;

( ५ ) समुद्राचें पाणी वाढलें व तो उंचावला; हिमालयानें आपलें डोकें वर केलें आणि दोघेही श्रीकृष्णाचें अवतरण विलोकूं लागले. ही कल्पना निःसंशय अद्भुत आहे. कुठें मथुरा, कुठें समुद्र, कुठें हिमालय ! सारेंच विलक्षण !

( ६ ) श्रीशंकर विष्णु–कृष्णलीला पाहण्यास्तव गंगेवरील काशीनगरीस आले आणि लीला पाहतां पाहतां काशीसच स्थिर झाले. कृष्णलीला यमुनातीरीं झाल्या त्या शंकरांनीं गंगातीरावरून पाहिल्या आणि काशींत विश्वेश्वररूपानें स्थिर झाले ही कल्पना अद्भुत तशीच अगम्य आहे.

( ७ ) कनक–सुंदर–कनकाप्रमाणें–सोन्याप्रमाणें पिवळाधमक; शेला–वस्त्र विशेष; द्विजसमूह–पक्षीगण अथवा ब्रह्मवृंद;

( ८ ) यमुनेचा प्रवाह कृष्ण कृष्ण म्हणत वाहत होता अशी कल्पना आहे; भुंगे कमलांच्या कानांत कृष्णकथा सांगत होते; त्या नलिनी प्रफुल्ल झाल्या होत्या, हंसत होत्या; ही कल्पना आहे.

( ९ ) वारा वाहत होता त्यामुळें तरुलतांचीं पानें हालत होतीं व त्यांतून हरिभजनाचे रव निघत होते. कीचकदंड–बांबू वाऱ्यानें हालत परस्पर घर्षण झाल्यामुळें कृष्णनामोच्चारण करीत आहेत असा भास होत होता. श्लोक ७–८–९ यांत प्रातःकाल वर्णन आहे.

( १० ) यांतील प्रथम दोन चरणांत चेतनागुणोक्ति व द्वितीय दोन चरणांत विषम अलंकार मानावा.

( १३-१४ ) येथें वत्सलरस मानावा.

( १६ ) तटिनिला-नदीला, यमुनेला.

( १८ ) येथें उदात्त अलंकार मानावा.

( १९ ) पीन-पुष्ट; कुचाचा-स्तनाचा.

( २० ) तृतीय चरणांत उत्प्रेक्षा अलंकार झाला आहे.

( २१ ) अरुणबिंबधरोष्ठी-जिचे ओष्ठ बालसूर्याच्या बिंबाप्रमाणें आरक्त आहेत; शुभ्रकुंदकलिकारदपंक्ती-जिची दंतपंक्ती शुभ्रकुंद फुलांच्या कळ्यांच्या मालेप्रमाणें आहे; कलापवती-केशाचा झुबका आहे ती; तनुकांती-देहाची कांती. वर्ण, प्रभा.

( २२ ) कमलनीलकटाक्षी-निळ्या कमलाप्रमाणें दृष्टि-पात-नेत्रक्षेप जिचे ती;

( २४ ) येथील तृतीय व चतुर्थ चरणांत विभावना अलंकार जाणावा.

( २५-२६ ) यांत उपमा अलंकार साधला आहे.

( २८ ) उत्तरार्धांत विभावना अलंकार मानावा.

( ३१ ) येथें लोकोक्ति अलंकार साधला आहे.

( ३२ ) या व पुढील तीन श्लोकांत रावेचें वर्णन आहे. विकचपद्मविलासी-श्रोणिकांचिगुणशब्दवती-कंबरपट्ट्यांतून शब्द निघत आहे अशी. ढुंगण हालल्यामुळें असा नाद निघतो. 'ठुमकत मुरडत चाले गजगति ' असें एका कवीनें म्हटलें आहे. तसेंच हें वर्णन आहे.

( ३३ ) यक्षिणीच, रंभा, या पदांनीं उत्प्रेक्षा अलंकार साधला आहे. रंभा-इंद्रसभेंतील अप्सराविशेष. रसिकलोक-कदंब-रसिकांचा समुदाय.

( ३४ ) कदली–केळ; चांदनीय–चंदनासंबंधीं; धाता–ब्रह्मदेव;

( ३५ ) क्षाळिली–धुतली; पयोनिधिमाजी–दुग्धसमुद्रांत;

( ३६ ) विमल हें विशेषण आणि सति हें पद खुबीदार आहे. 'भक्तदास हरि, ती हरि दासी' हें वर्णन मधुर आणि सार्थ आहे. 'भक्तपराधिन मी नारदा' असें श्रीहरीचें वचन आहे. 'अंकित भक्ताचा भगवान' असें संताचें वचन आहे, 'स्थिरपति चरपति परम, समर्थहि, अंकित भाविक भक्तजनांचा रमारमण निधि भक्तिसुखाचा' ही कविकिंकरांची उक्ति आहे. 'खास दारापरी' अर्जुनाचें दास्य केल्याचें मोरोपंतांनीं केकेंत सांगितलें आहे.

( ४१ ) चमके–चकित झाली.

( ४३ ) येथून निसर्गशोभावर्णनाला आरंभ झाला आहे. समीर–वारा; मृदुल–कोमल; शामशरीर–कृष्ण–काया; सिकतेला–वाळूला;

( ४८ ) वीचिहस्त–लाटा; सरितेला–नदीला;

( ४९–६४ ) यमुनातटाचें वर्णन शांति–भक्तिरसपर केलेलें आहे.

---

## सर्ग २

श्रीकृष्णदर्शन घेऊन राधा यमुनातीरावरून घरीं परत येते; तिची सासू तिला दुःशब्दांनीं छळते ( १ ते १५ श्लोक ); राधेची विकल स्थिति व दुःखोद्गार ( १७ ते २१ श्लोक ); त्यांचा कृष्णाठायीं परिणाम ( श्लोक २२–२४ ); शेजारिणींच्या राधेच्या सासूजवळ दुरुक्ति ( श्लो. २५–२६ ); राधा प्रशस्ति ( श्लो २७ ते ३२ ); जनापवाद ( श्लोक ३३–३४ ); राधेचा पति घरीं येतो, त्याचे आक्षेप व तिचें उत्तर ( श्लो. ३५–७३ ) उत्तरांत निर-

निराळ्या प्रतिज्ञांनीं राधा आपला भक्तिभाव प्रगट करिते आणि शेवटीं त्यास सांगते कीं मी पुढें जात्यें, तुम्ही मागून या आणि देव व भक्त यांचा शुद्ध संयोग पहा.

ह्या सर्गांतील सर्व पद्यें वसंततिलका वृत्तांत आहेत. त्याचें लक्षण असें आहे:—

येती वसंततिलकापदिं आठ साहा ।
ता भा ज जा ग ग असा क्रम तेथ पाहा ॥
– – ᵕ – ᵕ ᵕ ᵕ –, ᵕ ᵕ – ᵕ – –;

( १ ) नवपीन पयोधरा–नूतन पुष्टता पावलेले स्तन जिचे ती राधा; श्वश्रू–सासू; परुषवाक्पटु–कठिण भाषण करण्यांत चतुर; स्नुषेला–सुनेला; परुषवाक्शरताडणाला-कठिण भाषणरूपी शरांच्या माऱ्याला;

( २ ) प्रवाद–चर्चा; निंदा;

( ४ ) येथें ‘ लोकोक्ति ’ साधली आहे.

( ५ ) ‘ पोटीं सुरी खुपसवे नच कांचनाची ’ हें सुभाषित आहे.

( ६ ) येथून पुढें श्लोक १७ पर्यंत सासूचें गाऱ्हाणें अगदीं घरगुती भाषेंत सांगितलें आहे.

( १७ ) आरंभीं शरताडण म्हटलें त्यालाच येथें विषवमन म्हटलें आहे.

( १८ ) येथील व पुढील श्लो २०–२१ यांतील राधेचे विलाप भक्तशिरोमणि अशा तिला कितपत शोभण्यासारखे आहेत तें तज्ज्ञांनीं सांगावें.

( २२–२४ ) हे कवीचे उद्गार आहेत. भगवन्त महान् भक्तकैवारी आहे, तस्मात् हे उद्गार अनुचित नाहींत असें म्हणणें प्राप्त आहे.

( २५–२६ ) शेजारिणीस राधा उंटिणी परि थोर उंच वक्र दिसली असें सांगून कवीनें हास्य व अद्भुत रसांचे वर्णनांत तिखट मिश्रण केलें आहे.

( २७–३३ ) हे कवीचे उद्गार आहेत. शुद्धप्रेमाचा कामिकप्रेम म्हणून लोक विपर्यास करितात. ही लोकरीति निंद्य होय असें कवि म्हणतो.

( ३४ ) येथें उत्प्रेक्षा आहे.

( ३५ ) येथें 'लोकोक्ति' आहे.

( ३६ ) येथें रूपक आहे.

( ३७–४५ ) हें राधेच्या पतीचें भाषण साधें, सरळ, आहे.

( ४६–४७ ) हे कवीचे उद्गार आहेत. 'चातुर्य कां...... आलें' हें सुभाषित मानावें.

( ४८–६९ ) हें राधेचें पतीप्रत भाषण आहे. निरनिराळ्या प्रतिज्ञांनीं श्रीकृष्णाविषयीं आपला भक्तिभाव राधा प्रगट करिते आणि शेवटीं म्हणते 'अनुमोदन द्या. मी पुढें जातें, तुम्ही मागून या आणि भक्त व भगवंत समरस कशीं होतात तें स्वतः पाहा. मी यमुनाजलांत उडी घेतें आणि शुद्ध असेन तर तिच्या जलानें माझें वसनहि भिजणार नाहीं; अथवा चिता पेटवून सीते-समान देहशुद्धि सिद्ध करितें; किंवा पृथ्वीवर दोन्हीं हात ठेवून शपथ वाहतें कीं पापी असेन तर धरणीमाता दुभंग होऊन मला उदरांत लपवील अथवा शेषाला म्हणेन, असेल छाती तर दंश कर, नाहीं तर तुझें पद गेलेंच समज; किंवा हिमालयाचे पायथ्याशीं चला, त्याला म्हणेन मी अशुद्ध असेन तर माझें चूर्ण कर' अशा प्रतिज्ञा केल्याचें सांगितलें आहे. शेवटीं आनंददायक विदेह स्थितींत ती कृष्णाला भेटण्याकरितां चालल्याचें वर्णन आहे.

## सर्ग ३ रा.

या सर्गांतले ४२ श्लोक शालिनीवृत्तांत आहेत. शालिनीचें लक्षण:— ' चारा साता जे धरी शालिनी ती । पादीं तीच्या मा त ता गा ग येती ' हें वृत्त साधारणतः अद्भुतरस-विषयक आहे. या सर्गांत दुपारच्या वेळचें वनश्री-वर्णन आहे. ( १-६ ) नंतर गाईमागें हिंडल्यानें गोपाळांस परिश्रम होऊन ते श्रीकृष्णाच्या वेणुरवानें निद्रिस्त झाले असल्याचें सांगितलें आहे ( ७ ) त्या वेळीं कृष्णास राधेचें स्मरण झालें ( ८-१२ ) भक्त-भगवंत समागम पाहण्याच्या उद्देशानें राधेचा रमण-नवरा झाडावर बसला आहे ( १३-१५ ) त्याला पाहून भगवंत हंसतात ( १६-१८ ). इकडे राधा माधवाचा शोध करीत येते ( १९-२७ ) राधा-माधव भेट ( २८-२९ ) राधेचा पति क्रोधाविष्ट होतो. ( ३० ) त्याचे उद्गार ( ३१-४२ ).

( १ ) कालिंदीच्या-यमुनेच्या; आदर्श-तोयीं-आरशाप्रमाणें स्वच्छ चकाकणारें तोय-जल तेथें; रूपास-निजरूपास:

( ३ ) सस्यांकुर-सस्य-भाताचे रोम त्याचे अंकुर;

( ४ ) मारुताची-वाऱ्याची;

( ६ ) विलोल-चंचल;

( ८ ) व्योमभागांत-आकाशांत.

( १० ) शैल-पर्वत; स्थानभ्रष्टता-स्थानापासून दूर होणें; वारिधी-समुद्र, भक्तीण-भक्ति करणारी स्त्री;

( ११ ) पीयूष-अमृत; क्षीराब्धी-दुग्धसमुद्र; चतुर्थचरणावरून पुढील पद्याची आठवण होते. 'नित्य भेटतो देव म्हणुनि काय जनास सांगावा ! '

( १२ ) दिव्यानुभूती–श्रेष्ठ अनुभव; सुषुप्त–निद्रिस्त:

( १३ ) माधवीचें–वासंतिकलतेचें:

( १४ ) देवकीचा किशोर–वसुदेव–स्त्री–देवकी तिचा शिशु–बाळ,

( १५ ) विश्वासानें–खात्रीनें.

( १७ ) राधेचा नवरा–रमण–वृक्षावर लपून बसला होता त्याला उद्देशून श्रीकृष्ण भगवंत म्हणतात–राधा जारिणी आहे या शंकेनें हा वेडा व्यापला आहे; याला माझी माया काय माहित ? हा खरोखर दुर्दैवी होय. ह्याची स्त्री साध्वी असून तिच्या पातिव्रत्याविषयीं हा व्यर्थ शंकित झाला आहे. हें भाषण स्वगत आहे.

( २१ ) पुष्कराक्षा–पुष्कर–निळें कमळ त्यासारखे अक्ष, नेत्र आहेत ज्याचे तो.

( २२ ) वीचिमाला–लाटावर लाटा; स्वर्धुनी–स्वर्ग–गंगा; येथें उत्प्रेक्षा आहे.

( २५ ) पादपद्म, भृंगी–येथें रूपक–उपमा–अलंकार झाला आहे.

( २७ ) नीलरत्नप्रभेचा, सौंदर्याचा; दयेचा मेघ–येथें उत्प्रेक्षा अलंकार आहे.

( ३० ) निष्काम प्रीतीस साधारणजन सकामप्रीति मानतात आणि पुरुष स्त्रीची प्रीति संकुचित करूं इच्छितात ते अभागी, ही द्विविध जनरीति येथें सांगितली आहे.

( ३१–४२ ) हे राधेच्या पतीचे संतापाचे बोल आहेत. येथें ठायीं ठायीं लोकोक्ति व अर्थांतरन्यास अलंकार आहेत.

## सर्ग ४ था.

या सर्गाचे ४० श्लोक शालिनी वृत्तांतच आहेत. याचें लक्षण मागें दिलें आहे. परीक्षेची वेळ असतां पतीला शंकित करून मला विनाकारण जनापवादाच्या संकटांत टाकलेंस हें माधवा! चांगलें केलें नाहींस. यामुळें तुलाही संकटांत पडावें लागेल, अशा आशयाचा विलापकल्लोळ येथें आहे ( १–२९ ). पुढें श्रीकृष्ण राधेस 'मी तुला केव्हांही विसरणार नाहीं', असें प्रत्युत्तर देत असल्याचें वर्णिलें आहे ( ३०–४४ ).

( १ ) येथें १–२ चरणांत दृष्टांत व ३-४ चरणांत उपमा अलंकार आहे.

( ४ ) बाला या पदानें राधेकडे कन्येचें नातें लाविलें आहे.

( २ ) येथें सुभाषित आहे.

( १२ ) येथें 'दासी' पद योजून भक्तिण हें नातें जोडलें आहे.

( १३ ) 'साध्वीचा शाप' ही कल्पनेची भरारी 'आतांच उद्धार करा पुढें जड जाईल' या अर्थाच्या पूर्वकालीन कवींच्या भावनेस धरून आहे.

( १४ ) बलिराजाच्या कथेस अनुलक्षून हें भाषण आहे. ही पुराणप्रसिद्ध कथा सर्वश्रुत आहे.

( १५ ) भृगु ऋषीनें लत्ताप्रहार केल्याची कथा भगवंताची ब्राह्मणप्रियता आणि भक्तवत्सलता दर्शविणारी आहे म्हणून नेहमीं सांगण्यांत येते.

( १८ ) चतुर्थ चरण सुभाषित आहे.

( २२ ) 'मत्तातासारखा नंदराजा' या पदांनीं राधा–माधवांत्रें बहीण भावाचें नातें साधलें आहे.

( २८ ) येथें राधा माधवांचें मयूरी–मेघांचें नातें जोडलें आहे.

( ३२-३९ ) 'मा भी' अशा अर्थाचें श्रीकृष्णाचें भाषण आहे. शेवट गोड होईल. तुझ्या निःसीम भक्तीची साक्ष पुढें पटेल, भिऊं नको, असें माधवानें राधेचें समाधान केलें आहे. भक्तजनावर संकटें येतात तीं त्यांची प्रतिष्ठा वाढविण्याकरितां येत असतात हा भाव कविसंकेतास अनुसरून आहे.

---

## सर्ग ५ वा.

ह्या सर्गांत ५८ श्लोक आहेत. ते सर्व मालिनी वृत्तांत आहेत. मालिनी वृत्ताचें लक्षण असें आहे:—

प्रथम यतिस घेते अष्टमीं मालिनी ते
न न म य य गणातें जी पदीं वागवीते
⏑ ⏑ ⏑ ⏑ ⏑ – –, ⏑ – – ⏑ – –,

आरंभीं वर्षाकालाचें वर्णन आहे आणि राधा यमुनातीरावरील एका कुंजांत निष्काम भावानें कृष्णगुणकीर्तनांत निमग्न झाली असल्याचें वर्णिलें आहे ( १ ते २५ ) पुढें श्रीकृष्ण गोपांसमवेत गाई चारीत चारीत आणि बासरी वाजवीत कालिया डोहाकडे आल्याचें निरूपण आहे ( २६ ते ३२ ) डोहाचें वर्णन व श्रीकृष्णाची डोहांत उडी ही पुढील श्लोकांत ( ३३ ते ५८ ) सांगून सर्ग संपविला आहे.

( १ ) रजत सलिलधारा-रजत-रूपें त्याप्रमाणें शुभ्र सलिल-पाणी त्याच्या धारा मेघमाळा-मेघ-ढग त्यांची माला-रांग. कनकनिभ तनूची- कनक-सोनें त्याप्रमाणें कांति आहे जिची अशा तनूची. जहाली-झाली. शोधिती-धुंडत्या झाल्या.

( २ ) अपरिचलित-स्थिर. नीर-पाणी. कलरव कलकल-रव-शब्द. मूढ-व्याकुल. यांतील प्रथम तीन चरणांत उदात्त वर्णन आहे आणि चतुर्थ चरणांत अर्थांतरन्यास-अलंकार आहे.

( ८ ) चौथा चरण सुभाषित आहे.

( ९ ) प्रसृत–वितीर्ण, विटप–वृक्ष.

( १३ ) निमीलितः–मिटलेल्या. गंभीरा–गभीर हें मुद्रा याचें विशेषण. शीर्षी–मस्तकावर.

( १४ ) यांतील १ ला चरण our Father who art in Heaven. याशीं ताडून पहावा.

( १५ ) राधेयमूर्ति=राधेची मूर्ति.

( १७ ) नयन–सलिल–धारा लाजवीती घनाला=तिच्या नेत्रांतून अश्रुधारा अशा ढळढळ वाहत होत्या कीं मेघांतूनही तशा पाण्याच्या धारा वाहत नसतील.

( १८ ) रोदनांनीं=रडून रडून.

( २२ ) अंभोदराजे=मेघराजे.

( २३ ) हें यमुनेचें वर्णन आहे. अकलुषजलदात्री–निर्मल जल देणारी. पावना–पावन करणारी–हरिततरुलतांनीं हिरव्यागार वृक्षलतांनीं. सूर्यजा–यमुना.

( २४ ) हें उपवनाचें वर्णन आहे. काननाम्रा=रानांतील आम्र–आंबे.

( २५ ) येथील प्रवाहाचें वर्णन चिंतनीय आहे.

( २९ ) वेणुनादाचा प्रभाव एथें सांगितला आहे. मयूरी, हंसी, हरिणी, सर्पिणी साऱ्या दंग झाल्या. असें वर्णन आहे.

( ३० ) 'हरिविण दुसरा हो ! कोण संसारसाक्षी' ? हा चरण गोड आहे.

( ३२ ) चौथा चरण सुभाषित आहे. कपाळावर गोंदलेलें पुसून टाकतां येत नाहीं हा भाव.

( ३३ ) चतुर्थ चरण सिद्धांतवाचक आहे.

( ३५ ) कालियाच्या डोहाजवळच्या प्रदेशाचें हें वर्णन आहे. चतुर्थ चरण सुभाषित आहे. कुग्रामवास.

( ४२ ) चित्त शुद्ध तरी शत्रु मित्र होती । व्याघ्रही ना खाती सर्प तया ॥ ही तुकोबांची उक्ति पाहा.

( ४४ ) उत्प्रेक्षा आणि असंभावना मिश्र आहे.

( ४८-४९ ) एथें वत्सल रस आहे.

( ५१ ) निम्नगा—नदी.

( ५३ ) चतुर्थ चरण 'प्रभुविण भवदुःखें कोण निःशेष भंगी' असा असता तर सुभाषित अधिक गोड होतें.

( ५६-५८ ) हें उडी घेतल्याचें वर्णन अद्भुतरसपर आहे.

---

## सर्ग ६

हा वंशस्थ वृत्तांत आहे. एकंदर श्लोक ५४ आहेत. वंशस्थ वृत्ताचें लक्षण असें आहेः—

विराम वंशस्थ पदांत शेवटीं ।।
ज ता ज रा हे गण तेथ राहती ॥
ᐡ-ᐡ ᐡ – – ᐡᐡ –ᐡ –ᐡ–

श्रीकृष्णानें कालियाच्या डोहांत उडी घेतल्यानंतर गोप भयभीत होऊन घरोघरीं पळाले. कृष्ण डोहांत बुडाल्याची वार्ता सर्वत्र पसरली ( १ – ४ ) यशोदेला ती कळली तेव्हां ती धांवत यमुनेवर गेली व शोक करूं लागली ( ५ – ९ ) यमुनाही शोक करूं लागली ( १० – १२ ) लोक जमले व रडूं लागले ( १३ ) यशोदेचा शोक पुढें चालू ( १४ – १७ ) इतक्यांत नारद आले ( १८ – २१ ) त्यांचें वंदन ( २२ – २५ ) नारदाची स्तुति ( २६ – २७ ) यशोदा नारदास विनविते ( २८ ) नारदाचें यशोदेप्रत भाषण ( २९ – ३५ ) ज्याची श्रीकृष्णावर निष्काम-निष्ठावंत = शुद्ध प्रीति असेल त्या कृष्णभक्तानें हाक मारावी म्हणजे कृष्ण परमात्मा तत्काळ वर येईल असें नारदानीं सांगितलें. तेव्हां प्रथम दांभिक हरिभक्त पुढें झाले ( ३९ – ४२ ) नंतर नंद पुढें झाला ( ४२ – ४४ ) यशोदा पुढें झाली ( ४५ – ४६ ) पेंद्या पुढें आला ( ४९ ते ५३ ) सर्व यत्न वृथा ठरले ( ५४ ).

( ४ ) एथील अरिष्टता, अनर्थता हे प्रयोग पहावे.

( ५ ) तृतीय चरणांत दृष्टांत आहे.

( ६, ७, ८ ) करुणरसपर हीं पद्यें आहेत.

( १४ ) शोकरसपर आहे.

( २१ ) नारदाला नभांतलें शशिरत्न ही नवीन संज्ञा सूचित केली आहे. व्युत्पत्तिदृष्ट्या मेघ म्हणतां येईल कीं नाहीं ?

( २५ ) मोहुनी—या पदाचा विकृतिपर अर्थ एथें घेऊं नये.

( ३६ ) एथें दृष्टांत आहेत.

( ४४ ) 'खळाळलें नीर न तीर हाललें' ही ओळ गोड आहे.

( ४८ ) एथें यशोदेनें कृष्णास नवमास उदरीं वाहिलें असें म्हटलें आहे. देवकीनें तेंच केलें होतें.

---

## सर्ग ७ वा.

ह्या अंतिम सर्गांत इंद्रवज्रा वृत्तांतले ५८ श्लोक आहेत. ह्या वृत्ताचें लक्षण असें आहे:—

घे इंद्रवज्रा पदिं पांच साहा
ता ता ज गा गा क्रम तेथ पाहा
— — ᵕ — —, ᵕ ᵕ — ᵕ — —,

नन्द, यशोदा, पेंद्या यांच्याही हांकेनें कृष्ण डोहातून वर येईना तेव्हां सर्वत्रांना मोठें आश्चर्य वाटलें आणि सारे पुढें कसें होणार या विचारांत पडले ( १–५ ) नारद स्वतः कृष्णास बोलावोल असें त्यांस वाटलें ( ६ ) नारदांनीं तपस्विनी राधा येत आहेसें पाहून तिला प्रसंगाची ओळख करून दिली आणि कृष्णास हाक मार म्हणून सांगितलें ( ६–२० ) राधेनें कृष्णाचा स्तव केला. ( २१–४० ) आणि त्याला आव्हान केलें. आनंदकल्लोळांत कृष्ण वर आला. ( ४१–५१ ) उपसंहार ( ५१–५८ ).

( ६ ) तृतीय व चतुर्थ चरण सुभाषित आहे. 'महज्जनांना भजतात तेव्हां,'

( ७ ) व्यभिचार कीर्ति हा प्रयोग चिंतनीय आहे.
( १० ) एथें उत्प्रेक्षा आहे.
( १८ ) "भक्ती नसे वाङ्मय भाषणांत,
भक्ती असे उत्कट भावनेंत" हा तत्त्वज्ञानविषयक सिद्धांत आहे.
( १९ ) ३ रा व ४ था चरण गोड आहे.
( २२ ) चतुर्थ चरण सुभाषित आहे.
( २३ ) भक्तिप्रधान वीररस एथें आहे.
( २६ ) हें पद्य चिंतनीय आहे.
( २७ ) आशी—आशिर्वाद.
( ४४ ) रक्त—लाल.
( ५३ ) भारत-भू-ची प्रौढी यथार्थ वर्णिली आहे.

---

गोदावरी मज्जननी विशुद्ध ।
मुकुंद मत्तात जनीं प्रसिद्ध ।
समर्थ माझे गुरु कृष्ण-राम ।
कौंडिण्य मी त्या करितों प्रणाम ॥
मत्तात मद्बंधु सखा मदीय ।
श्रीकृष्ण मी यास्तव माधवीय ।
श्री माधवाची म्हणुनी कशी ही ।
सेवा सहावी लघु माधवी ही ॥
तुझे वंदुनी पाय राधाभिरामा ।
तुला मागतों दुःखबाधाविरामा ।
तुझा छंद लागो समर्था त्रिकाळीं ।
तुझें नाम सेवो मुखीं अंतकाळीं ॥

शुभंभवतु.

# काव्यरत्नावली मासिक पुस्तक.

हें मराठी कवितांचें मासिक ३२ वर्षें चालू आहे. यांत हल्लींच्या नामांकित कवींच्या कविता येतात. दरवर्षी तीन हजार कविता येते. वर्षारंभ जानेवारी. आरंभापासून अंक मिळतात. केंव्हांही वर्गणीदार होतां येतें. वार्षिक वर्गणी टपाल व्ही. पी. सह २ रु. मागील सालांचीं बांधलेलीं १८ पुस्तकें ९ रुपयांत मिळतात. मात्र १८ पुस्तकें मागवावीं. रवाना खर्च निराळा. ह्या पुस्तकांत टिळक, केशवसुत, विनायक, गोविंदाग्रज, मुजूमदार इत्यादिकांच्या प्रासादिक कविता आहेत. काव्यरत्नावलीच्या नवीन वर्गणीदारांस साहित्य–चंद्रिका हें उपयुक्त पुस्तक बारा आण्यांस मिळतें. या पुस्तकांत वृत्त, रस, अलंकार वगैरेचें विवेचन फार चांगलें केलेलें आहे. यांत जुन्या व नव्या कवींच्या कवितांचीं उदाहरणें आलेलीं आहेत. हें पुस्तक काव्यप्रिय वाचकांनीं जरूर संग्रहीं ठेवावें. ट. ख. निराळा.

संपादक, काव्यरत्नावली,

जळगांव—पू. खा.

# सुभाषितमराठी.

संस्कृतांतून सुंदर सुंदर श्लोक निवडून त्यांचें हें मराठी पद्यमय भाषांतर केलें आहे. शिवाय प्रत्येक श्लोकाखालीं श्लोकांतील अपरिचित शब्दांचा अर्थ दिला आहे. श्लोकाची रचना फारच सरळ व शुद्ध आहे. विवरणांत प्रत्येक श्लोकांत कोणता अलंकार आहे, त्याचें लक्षणही दिलेलें आहे. ह्या योगानें सर्व अलंकारांचें ज्ञान साहजिक होण्यासारखें आहे. एकंदर ही सुभाषितमराठी काव्यप्रिय वाचकांस प्रिय होईल अशी तिची रचना आहे. वाचकांनीं आज आपलीं नांवें नोंदून ठेवावीं.

संपादक, काव्यरत्नावली,
जळगांव–पू. खा.

मराठी ग्रंथ संग्रहालय
दा. क. ८८२८